विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| **मासिकाचे नाव** | **:** | **सद्धर्म : त्रैमासिक** |
| **संस्थापक** | **:** | **गुंडोपंत, हरिभक्त** |
| **संपादक** | **:** | **डॉ. विजय वा. बेडेकर** |
| **प्रकाशक** | **:** | **अनंत विनायक धोरे** |
| **प्रकाशन वर्ष** | **:** | **२०१९** |
| **वर्ष** | **:** | **चोप्पन्नावे** |
| **अंक** | **:** | **तिसरा** |
| **पृष्ठे** | **:** | **३२ पृष्ठे** |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

## गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१९

## गणपत्रिका क्रमांक : २०१

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : चोप्पन्नावे अंक : तिसरा आश्विन/कार्तिक १९४१ ऑक्टोबर २०१९

## संपादकीय

### धारणात् धर्मः ।

महाभारतात 'यक्षप्रश्न' नावाचे फार सुंदर प्रकरण आहे. धर्मराज युधिष्ठिराला तहान लागते. पाणी आणण्यासाठी तो आपल्या छोट्या भावाला, सहदेवाला पाठवतो. हा काळ पांडवांच्या वनवासाचा. सहदेव पाण्याचा शोध घेताना एका तळ्याजवळ येतो व पाणी पिऊ लागतो. त्यावेळी एक आवाज येतो, 'थांब! पाणी पिण्याआधी माझ्या प्रश्नांची उत्तरे दे'. हा आवाज ऐकून सहदेव चपापतो. तेवढ्यात त्या तळ्याचे रक्षण करणारा यक्ष प्रकट होतो. सहदेव व यक्षाची चर्चा होते. सहदेव यक्षाचे प्रश्न गांभीर्याने घेत नाही व पाणी पिऊ लागतो. तेवढ्यात पाण्याला स्पर्श झाल्याबरोबर सहदेव गतप्राण होवून पडतो. इकडे सहदेव अद्याप येत नाही म्हणून नकूल येतो. त्याचीही हीच गती होते. मग एकामागे भीम, अर्जून येतात व गतप्राण होवून पडतात. शेवटी युधिष्ठीर चारही भावांच्या शोधार्थ येतो व यक्षाची त्याची भेट होते. युधिष्ठिर आपल्या नावाप्रमाणे 'युद्धात स्थीर' वागतो. यक्षाच्या प्रश्नांची अचुक उत्तरे दिल्यावर यक्ष युधिष्ठिरावर प्रसन्न होतो व शेवटी सर्व पांडव जीवंत होतात. हा सर्व कथाभाग सांगण्याचे कारण. या यक्षाने विचारलेले सर्व प्रश्न अत्यंत सुंदर व कालोचित आहेत. त्यातील एक प्रश्न प्रस्तुत लेखाच्या विषयाशी नाते सांगणारा आहे. यक्ष विचारतो, 'कः पंथ?' अर्थात 'कोणता मार्ग योग्य' आहे त्यावर युधिष्ठिराने दिलेले उत्तर फार मार्मिक आहे. ते असे –

**श्रुतीर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्नाः।**
**नासौ मुनी यस्य वचः प्रमाणम्।**
**धर्मस्य अर्थो निहितो गुहायाम्।**
**महाजनो येन गतः स पंथः।।**

(पृष्ठ क्र. २८ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१. इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने कार्यालय बंद आहे. कृपया टपाल व मनीऑर्डर्स पाठवू नये.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता) परदेशस्थ सभासदांना १२५ $ (U.S.) दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता).५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, टपाल, मनीऑर्डर व धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) कार्यकारी विश्वस्तांच्या पत्त्यावर* पाठवाव्यात. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

*श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५/९०८२९९०४३१ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वादे (वार्षिक देणगीदार सभासद), दीका (दीर्घकालीन सभासद), आ.(आजीव सभासद), काभे (कायम भेट)'वादे' व 'दीका' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेले असते.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| कालभैरवाष्टकम्। | ६ |
| गीतकृष्णायन-भाग ६-युगांत | ७ |
| सुभाषित कथा | १२ |
| ''पूर्णावतार भगवान श्रीकृष्णांची युद्धनीति'' | १३ |
| ज्ञान आणि ज्ञान व्यवस्थापन | १९ |
| समर्थ रामदास स्वामी | २६ |



**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा रु. ५
२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि रु. ५
३) हरितालिका पूजा विधि रु. १०
४) श्री सत्यनारायण पूजा व कथा रु. १५
५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) रु. १०
६) तुलसी विवाहविधि रु. १०
७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) रु.२५
८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५
(या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)
९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०
१०) उपासना रु. ४०
११) श्रीरामरक्षेतील व्याकरण रु. ५०
१२) चांगदेव पासष्टी रु. ४०
१३) गंगालहरी रु. २५
१४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण रु. ३०
१५) सांख्यदर्शन रु. ३०
१६) श्री लक्ष्मी पूजा विधीः रु. १५
(हस्तलिखीत)


- या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
- या त्रैमासिकातील मजकूर संपादकांच्या परवानगीशिवाय कोणीही कुठेही छापू नये.
- मनीऑर्डरने पैसे पाठविताना मनीऑर्डर फॉर्मवर आपला मोबाईल क्रमांक लिहावा म्हणजे संपर्क करणे सोपे पडते.
- सद्धर्माच्या लेखकांनी त्यांचा लेख इतर ठिकाणी पाठविणे असल्यास तो सद्धर्माच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे असा उल्लेख करावा. **- संपादक**

परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील व दी.का. देणगीदारांची नावे अपरिहार्य कारणामुळे पुढील अंकात देण्यात येईल. **- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ४० वा

**प्रायेणाधममध्यमोत्तमगुणः संसर्गतो जायते।** [४२५]

जशी संगत असेल तसे माणसाचे व्यक्तिमत्त्व तयार होते. ढवळ्या शेजारी बांधला पवळा वाण नाही पण गुण लागला.

**सन्तप्तायसि संस्थितस्य पयसो नामापि न श्रूयते**
**मुक्ताकारतया तदेव नलिनी-पत्रस्थितं राजते।**
**स्वात्यां सागरशुक्तिमध्यपतितं सन्मौक्तिकं जायते**
**प्रायेणाधममध्यमोत्तमगुणः संसर्गतो जायते।।**
**भर्तृहरि नीतिशतक श्लो.।।१२०।।**
**वृत्त-शार्दूलविक्रीडित.**

**समश्लोकी मराठी :**

तोयाचे परि नाम हि उरते संतप्त लोहावरी
ते भासे नलिनीदलावरी पहा सन्मौक्तिकाचे परी
ते स्वातीस्तव अब्धि शुक्ति पुटकी मोती घडे नेटके
जाणा उत्तम मध्यमाधम दशा संसर्ग योगें टिके

पाण्याच थेंब तापलेल्या लोखंडावर जर पडला तर क्षणभरात त्याचे नाव सुद्धा शिल्लक राहत नाही. तोच पाण्याचा थेंब कमळाच्या पानावर पडला तर मोत्या सारखा शोभून दिसतो. स्वाती नक्षत्रामध्ये तो थेंब जर सागराच्या शिंपल्यात पडला तर त्याचा सुंदर मोती बनतो. माणसाच्या अधम, मध्यम आणि उत्तम ह्या अवस्था बहुधा संगतीमुळे होतात.

**अन्तः सुधासमधिकं हि रसं बिभर्ति।।** [४२६]

**बाह्याङ्गमात्रमवलोक्य न जातु कैश्चित्**
**कस्यापि शक्यमवधारयितुं गुणौघाः।**
**छन्नोऽपि कण्टकचयैः पनसो बहिस्तात्**
**अन्तः सुधासमधिकं हि रसं बिभर्ति।।**

केवळ बाह्याङ्ग पाहूनच माणसाची पात्रता ठरवू नये. कोणामध्ये किती गुण आहेत हे ठरविणे त्याचे बाह्य स्वरुप पाहून कधीच शक्य होणार नाही. फणसाचे सर्वाङ्ग काट्यांनी झाकलेले आहे पण आत अमृताहूनही मधुस असा रस भरलेला आहे.

**किं वाससैवं न विचारणीयं**

अहो, कपड्यांचे काय महत्त्व? असे म्हणू नका.

**किं वाससैवं न विचारणीयम्** [४२६]
**वासः प्रधानं खलु योग्यतायाः।**
**पीताम्बरं वीक्ष्य ददौ तनूजां**
**दिगंबरं वीक्ष्य विषं समुद्रः।।**

एक सुभाषितकार म्हणतो 'कपडेच' खरा योग्यतेचा निकष आहे. विष्णूचा पिताम्बर बघून समुद्राने आपली कन्या लक्ष्मी त्याला दिली व शंकराला 'विवस्त्र' (दिक् एव अम्बरं यस्य सः दिगंबरः बहुव्रीहि) पाहून त्याला विष दिले.

**कियत्तेजः पुच्छे तदपि बन गर्वेण वळसे ।।** [४२७]

अर्ध्या हळकुंडाने काय पिवळा होतोस?

**जगच्चक्षस्तेजोनिधिर्–**
**अखिलमाकाशमभि तो**
**मयूखैराक्रमन्नपि मनसि**
**मानं न वहते ।**
**कियान्खद्योत त्वं वियति**
**कियती ते गतिरहो**
**कियत्तेजः पुच्छे तदपि बन गर्वेण वळसे।।**

जगाचा डोळा असलेला आणि तेजाची खाण असलेला सूर्य आपल्या किरणांनी आक्रमण करून संपूर्ण आकाश तेजोमय करून टाकतो व मनात जरा सुद्धा गर्व आणित नाही.

हे काजव्या तुझे तेज ते केवढे फक्त शेपटीत आणि तरी तू हळकुंडाने पिवळा होतोस.

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड – ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८–२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

•••

**।। पातंजलयोगसूत्राणि ।।**

महर्षि पतंजलि हे महान चिकित्सक होते. त्यांनाच चरक संहितेचे प्रणेते मानले जाते. पतंजलि बहुधा पुष्यमित्रशुंगच्या शासनकालात होते (१९५ ते १४२ ई. पू., सुमारे २२२५ वर्षापूर्वी). राजा भोज ह्यांनी त्यांना शरीराबरोबर मनाचेही चिकित्सक असे म्हटले होते. या ग्रंथात जीवा–शिवाच्या, व्यष्टी–समष्टीच्या अद्वैताचे प्रतिकात्मक विवेचन केले असल्यामुळे भारतीय सांस्कृतिक ग्रंथात याला अनोखे स्थान प्राप्त झालेले आहे.

सद्धर्म त्रैमासिकाचे दुसरे संपादक कै. हरी जनार्दन दामले यांनी सद्धर्मचे संस्थापक संपादक कै. गोविंद महादेव नवाथे तथा गुंडोपंत हरिभक्त यांच्याशी या सूत्रांबद्दल पुष्कळ चर्चा केली होती व त्या चर्चे वरून सूत्रांचे सुलभ भाषांतर १९८६ साली करून सद्धर्मच्या वाचकांना उपलब्ध करून दिले होते.

त्या भाषांतराची दुसरी आवृत्ती एप्रिल / मे २०२० मध्ये करण्याचा सद्धर्मचा मनोदय आहे. त्यासाठी प्रकाशनपूर्व सवलत म्हणून नोंदणी करण्यासाठी इच्छुकांना आवाहन आहे. या पुस्तकाचे नोंदणी मूल्य रु. ७५/– असेल. नंतर त्याचे मूल्य रु. १२५/– असेल.

पुस्तकाचे नाव : ।।पातंजलयोगसुत्राणि।।, प्रथम प्रकाशन : १९८६,

पुस्तकाचा आकार : डेमी १/८, पृष्ठसंख्या : सुमारे १००.

अपेक्षित प्रकाशन : एप्रिल / मे २०२०.

संपर्क : श्री. प्रकाश भा. दीक्षित, भ्रमणध्वनी : ९०८२९९०४३१ / ९८१९६९३१९५

**कालभैरवाष्टकम्] (श्लोक तिसरा)** **दि. दा. औटी**

**(शब्दार्थ, अन्वय, समास, अनुवाद आणि वृत्त)**

**शूलटंकपाशदण्ड पाणि मादि कारणं**
**श्रयामकायमादिदेवमक्षरं निरामयम्।**
**भीमविक्रमं प्रभुं विचित्रताण्डवप्रियं**
**काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे।।**

शब्दार्थ : शूल (पुं.नपुं.) त्रिशूळ. टंक-पुं/नपुं शस्त्र (तलवार). पाश (पुं.) फास. दण्ड-पुं. काठी. पाणि-(पुं) हात (कविवत्). आदि कारणम् - जगाच्या उत्पत्तीचे कारण असलेल्या समास - शूलःच टंक-च पाशःच दण्डः च शूलटंकपाशदण्डाः इतरेतर द्वंद्व। शूलटंकपाश दण्डान् पाणौ यस्य सः तद्गुणसंविज्ञान बहु.। शूलटंकपाशदण्डपाणिः तम् शूलटंकपाशदण्डपाणिम्। (द्वितीया). आदि कारणम्-क.धा.। (द्वितीया) श्रयामकायम्-श्रयामः कायः यस्य सः। बहु.। तम् श्रयामकायम् (द्वितीया)

टीप : श्रयाम शब्द कोणत्याच कोशात मिळाला नाही. श्रित्र् भ्वादि उ.प. श्रयति-श्रयते आधार घेणे. अशी त्याची व्युत्पत्ति असावी.

आदि देवम् - क.धा. आदिः देवः तम्। (द्वितीया). अक्षरम्- न क्षरति इतिअक्षरः मत्र् बहु. निरामयम्-निर्गतः आमयः यस्मात् सः निरामयः बहु. तम्। (द्वितीया) भीमविक्रमम् - भीमः विक्रमः यस्य सः भीमविक्रमः बहु. तम् (द्वितीया) विचित्रताण्डवप्रियम्= विचित्रं (आश्चर्यकारक) ताण्डवम् विचित्रताण्डवम् क.धा. विचित्रताण्डवं प्रियं यस्य सः विचित्रताण्डवप्रियः तम्। (द्वितीया)

चौथी ओळ ध्रुवपद आहे व तिची टीका पहिल्या श्लोकाच्या वेळी लिहिली आहे.

अन्वय-शूलटंक .... अहं भजे।

टीप - कालभैरवाला कवीने लावलेली सर्व विशेषणे द्वितीया विभक्तीत आहेत. तसाच क्रम-अन्वयात घ्यावा.

भावार्थ : - ज्याच्या हातामध्ये त्रिशूळ, शस्त्र (तलवार) पाश व दण्ड आहे (काठी); जो विश्वाच्या उत्पत्तीचे कारण आहे, ज्याच्या शरीराचा सर्व विश्वाने आश्रय घेतला आहे. जो आदिदेव आहे व ज्याचा कधिही ऱ्हास होत नाही, जो निरामय (निरोगी) आहे, ज्याचा पराक्रम प्रचंड आहे असा जो प्रभू (देव) ज्याला वैविध्य असलेले (निरनिराळे भाव) - आश्चर्यकारक ताण्डव नृत्य प्रिय आहे व जो पुण्य काशीक्षेत्राचा मालक काळभैरव याला मी भजतो.

इति शम्। क्रमशः

**दि. दा. औटी**

•••

**'महानिर्याण' – जाती माधुरी**

तनु त्यागतसे गर्द वनी तरुतळि गोपाल
अवतार करी पूर्ण युगा येइ अंतकाल
देवकिनंदन राधेशाम देवकिनंदन राधेशाम ।। धृ ।।

अवतार घेइ भूवर जव घोर अंधकार
ग्रासोनि सकळ विश्व करी जीवना असार
त्या समयि विधाताच करी एक चमत्कार
घनशाम रूप घेउन हो गुणिजन आधार
घनदाट निशा उलटुन ये परत उषःकाल ।। १ ।।

खल वृत्तिसवे लढताना ना करि विश्राम
गीतामृतास देइ जना वदुनी निष्काम
निज धर्माला आचरता सर्वहि आराम
निरसूनी मोहास करी सकळ भ्रमविराम
सत् कार्याची सतत ठेवि पेटती मशाल ।। २ ।।

निष्काम भोग भोगुन होई चरित महान
दे सुहृदां अन आप्तांना अतुल समाधान
मिळवोनि देइ सकल जगी यदुकुलास मान
ना होत फिरुन संसारी योगि या समान
आदर्शभूत जीवन होई जनां विशाल ।। ३ ।।

अवतार कार्य संपताच यदुविर तो शूर
सोडून सर्व संग सुखे जाइ वनी दूर
रोखू न शके निष्कामा स्वजन अश्रू पूर
हो बासरिही मूक तिचे ना निघती सूर
कवटाळण्यास मृत्यूला त्यागि निज महाल ।। ४ ।।

येता अखेर समयच करण्या महाप्रयाण
मृग भासतसे व्याधहि आकर्ण ओढि बाण
घनघोर तीर वेधतसे अचुकते निशाण
ते निमित्त होत क्षणी हरी सोडी प्राण
विरत काननी करि आक्रोश महाकाल ।। ५ ।।

श्रीकृष्णाचं व्यक्तिमत्व, चरित्र, संदेश हे सर्वच दिव्य, शुद्ध, वैभवशाली, गौरवशाली, परम स्फूर्तीदायक !

अधर्माचा ऱ्हास आणि धर्माचा विकास, दुष्टांना शासन आणि सज्जनांना संरक्षण, अज्ञानाला मज्जाव आणि अतिशय पवित्र अशा ज्ञानामृताचा वर्षाव, दुःखाचं समूळ उच्चाटन आणि निखळ आनंदाचं निर्मळ प्रक्षेपण हे त्याचं ब्रीद!

या ब्रीदाचं कसोशीनं पालन करायला तो आनंदघन किती एक अवतार घेतोय. आपण जीवन सुखानं, समृद्धीनं, तनमन निरोगी करून आणि मती शुद्ध करून सर्वांगीण परिपूर्णतेनं पण तरिही निष्कामपणे भोगावं म्हणून राजविद्येचे धडे घालून देतोय. आपण यशवंत, किर्तीवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, पुण्यवंत आणि जयवंत व्हावं म्हणून राजगुहय सांगतोय. आपण आचारशील, विचारशील, धर्मशील, चारित्र्यशील आणि सर्वज्ञपणे सुशील व्हावं म्हणून योगशास्त्र शिकवतोय. श्रीमंत योग्याचं आयुष्य कसं असतं हे सोदाहरण दाखवून देतोय. आपल्यालाही त्या राजमार्गावर, उपासनामार्गावर, प्रेममार्गावर, आनंदमार्गावर चालायला प्रवृत्त करतोय.

आपण हया मार्गावर चालत असताना तो सदैव आपल्याबरोबर आहे. अनंतरूपे अनंतवेशे तो आपलं योगक्षेम वहातोय. कधी मातापित्याच्या रूपानं, कधी मित्राच्या रूपानं. कधी गुरूच्या रूपानं तर कधी बंधूच्या रूपानं. कधी सावली देणाऱ्या वृक्षाच्या रूपानं तर कधी क्षुधाशांतीसाठी भक्ष्याच्या रूपानं. कधी विसावा देणाऱ्या वाऱ्याचा रूपानं तर कधी दिशा दर्शवणाऱ्या ताऱ्याच्या रूपानं. कधी डोळे निववणाऱ्या फुलाच्या रूपानं तर कधी मन रमवणाऱ्या मुलाच्या रूपानं. कधी वात्सल्यमूर्ती गाईच्या रूपानं तर कधी शांत मंजुळ अंगाईच्या रूपानं. कधी उत्फुल्ल मनोहर रंगांच्या रूपानं तर कधी वेडावून टाकणाऱ्या सुमधुर गंधांच्या रूपानं. कधी आश्वासक मृदू स्पर्शाच्या रूपानं तर कधी कारंज्यासारख्या उसळणाऱ्या हर्षाच्या रूपानं. कधी भक्कम आधार देणाऱ्या धरणीच्या रूपानं तर कधी मंगल सुखदायक करणीच्या रूपानं. कधी जीवनदात्या जलाच्या रूपानं तर कधी ताज्या रुचकर फलाच्या रूपानं. कधी सूर्य बनून वर्षणाऱ्या प्रकाशाच्या रूपानं तर कधी सतत असणाऱ्या भव्य आकाशाच्या रूपानं!

आणि जसा तो बाहेर सर्व चराचर भरून राहिलाय तसाच तो आपल्या रोमारोमात आणि अंतर्यामात सुद्धा सतत वास करून राहिलाय. आपलं शरीर बनून तो आपल्या अस्तित्वाला चालवतोय. मन बनून तो आनंदाचं अनुसंधान करतोय. विवेकबुद्धी बनून तो अज्ञान दूर करतोय. आणि याही पलिकडे दिव्य, शुद्ध जाणीव बनून आणि विश्वात्मा म्हणून तो आपल्या हृदयात कायमचं वास्तव्य करून राहिलाय.

मंडळी, हनुमंतासारखं निरागस उत्सुकतेनं आणि निरपेक्ष भक्तिनं जरा स्वतःच्या हृदयात डोकावून तर पहा! प्रत्यक्ष श्रीकृष्ण परमात्मा आपल्या एकूण जीवनाचा, अस्तित्वाचा, 'असले'पणाचा, 'मी'पणाचा अविभाज्य भाग बनून राहिलाय, अधिष्ठान बनून राहिलाय याचा 'करतलामलकवत्' अनुभव आपल्यापैकी प्रत्येकाला येईलच येईल...

**'जेथे जातो तेथे' – वृत्त शार्दूलविक्रिडीत**

कृष्णाने अपुलेच दर्शन मला स्वप्नामधे दीधले
घेऊनी जवळी लगेच पुढती हासोनि संबोधले
'वत्सा नेक तसेच मंगल तुझे आदर्श हे वागणे
संकोचा विसरी मला झडकरी सांगी तुझे मागणे'
।।१।।

'मागावे जर' लागलीच वदलो 'काहीच म्या पामरे
हाती हात धरोन तू मजसवे कालत्रयी चाल रे'
आश्वासून वदे 'स्वये करीतसे कर्तव्य हे सर्वथा
सामोऱ्या असता झकास गमती वा जीवघेण्या व्यथा' ।। २ ।।

'मागे तू जर पाहिलेस दिसती माझ्या स्वतःच्या खुणा
टाकोनी तुज ना कधी दवडला मी वेळ माझा उणा'
ऐकोनी प्रभुच्या प्रमाण वचने मागे स्वतः पाहिले
मार्गीचे प्रभुचे ठसे उमगले माझ्या पदी गुंतले
।।३ ।।

आपत्काल पथा जरा निरखुनी मी पाहिले जेधवा

होती दोनच पाऊले मज मनी शंका उठे तेधवा
'जेव्हा मी सुख देखिले मजसवे देवा तुम्ही चालला
दुःखाच्या समयी मलाच पथ हा शोधावया लागला' ।। ४ ।।

'वेड्या तू चुकलास रे अंमळसा' हासोनि ते बोलले
'आपत्काल पथावरील सगळी माझीच ती पाउले
माझे पाय सुखामधे जरी तुझ्या शेजारुनी चालले
दुःखे पाहुन मी तुला उचलुनी खांदयावरी घेतले' ।।५।।

'हरी' म्हणजे परब्रह्मस्वरूप विश्वात्मा, परमात्मा अथवा सच्चिदानंदस्वरूप दिव्य, शुद्ध जाणीव व नेणीव. 'हरिदास' म्हणजे अहंकाररूपी जीवात्मा अथवा अहंमन्यतेमुळे किंवा अज्ञानामुळे किंवा विपरीत ज्ञानामुळे अशुद्ध झालेली जाणीव व नेणीव. (यापुढे 'जाणीव' हा एकच शब्द 'जाणीव व नेणीव' यांच्याऐवजी वापरला आहे.) उपासना किंवा धर्मपालन म्हणजे आत्म्याचं अथवा जाणीवेचं शुद्धीकरण. अहंकार म्हणजे आत्म्याचं स्वरुपाविषयीचं विपरीत ज्ञान अथवा अज्ञान. हा अहंकारच सर्व दुःखांचं मूळ असतो. जाणीवेच्या शुद्धीकरणाच्या प्रक्रियेत अहंकार नष्ट होतो आणि आत्मा सच्चिदानंदस्वरूप होऊन ब्रह्मसुख उपभोगतो. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' आणि 'अहं ब्रह्मास्मि' च्या साक्षात्कारालाच मोक्ष, निर्वाण अथवा मुक्ति असं म्हणतात.

उपासनेत प्रार्थनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जीवात्म्याने उपासना कायावाचामने करायची असते. यात बौद्धिक आणि मानसिक पातळीवरील उपासनेला सर्वात जास्त महत्त्व आहे कारण आचार आणि उच्चार हे विचारांपासून सुरू होतात. बहिर्मन माणसाचे विचार ठरवतं, त्याचे आचार व उच्चार ठरवतं आणि परिणामस्वरूप त्याचं भाग्य ठरवतं. बहिर्मन आणि अंतर्मन ही जोडगोळी अल्लाउद्दिन आणि जादूच्या दिव्याप्रमाणे असते. अल्लाउद्दिन जी जी इच्छा (सतत) करेल त्याप्रमाणे जादूच्या दिव्यातील राक्षस ती पूर्ण करत जातो.

यास्तव, तोच सहजभाव होईपर्यंत, जाणीवपूर्वक आणि सतत केलेलं शुभचिंतन ही यशस्वी, निरोगी आणि सुखी जीवनाची गुरूकिल्ली आहे असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. शुभचिंतनात परत ईशचिंतन (स्वरूपचिंतन) आणि ईष्टचिंतन (स्वधर्मचिंतन) ह्या दोन गोष्टी अंतर्भूत होतात. इथे स्वधर्मचिंतन हा शब्द व्यापक अर्थानं वापरला असून त्यात स्वधर्मचिंतनानं आपोआपच होणारं तदनुषंगिक स्वधर्माचरणही अभिप्रेत आहे. प्रार्थना हे सर्वोत्कृष्ट प्रकारचं शुभचिंतन असून त्यात आनंदस्वरूपाचं स्मरण (ईशचिंतन) आणि प्रक्षेपण (स्वधर्मचिंतन, स्वधर्माचरण) हया दोन्ही गोष्टींचा समावेश आहे. यस्वफरूप सर्वव्यापी आहे आणि हया यस्वफला धारण करणाऱ्या म्हणजेच पोषक असणाऱ्या यस्वफधर्मामधे स्वतःच्या व्यक्तिमत्वाबरोबरच, म्हणजेच जीवात्म्याला प्राप्त झालेल्या शरीर, मन आणि बुद्धिच्या उपाधीबरोबरच, इतर सर्व चराचर सृष्टीच्या हिताचाही विचार आहे.

अशा तऱ्हेनं अज्ञान नष्ट करून चिर आणि परम आनंदस्वरूपाप्रत नेणाऱ्या

उपासनेचं प्रार्थना हे मूळ आहे.

हरिदासानं हरीप्रार्थनेची सुरूवात हिंदू उपासनापद्धतीनुसार गणेशस्तवनानं केली असून शेवट फलश्रुतीनं केला आहे. मधल्या श्लोकांमधे श्रीकृष्ण परमात्म्याचं सगुण वर्णन, स्वतःचा शारिरीक, मानसिक, बौद्धिक विकास, इतर भूतमात्रांचा शारिरीक, मानसिक, बौद्धिक विकास आणि निर्गुण वर्णन अशी रचना केलेली आहे. प्रार्थनेच्या मांडणीसाठी 'भुजंगप्रयात' वृत्ताचा वापर केलेला आहे.

एकवीस श्लोकांची ही रचना अवघ्या सात मिनिटांमधे म्हणून पूर्ण होते. उपासकानं दररोज किमान एकदा हरीप्रार्थना जाणीवपूर्वक, मनोभावे, अर्थ समजून घेऊन व शक्यतो मोठयाने म्हणावी. सर्व मराठी भाषिकांनी ही एकवीस मौक्तिकांची माळ कंठस्थ करून चिर आणि परम यश, आरोग्य, सुख आणि शांतीचा लाभ करून घ्यावा हीच हरिदासाची विनंती आहे...

**।। हरिदासकृत 'हरीप्रार्थना' ।। – वृत्त भुजंगप्रयात**

जगी पाहता एक तू बुद्धिदाता
जगी पाहता एक तू विघ्नहर्ता
गणेशा मती आपुलीशी करावी
हरीप्रार्थना लागवेगे स्फुरावी ।।१ ।।

दयाळू क्षमाळू मवाळू कृपाळू
घनश्याम रूपी जनीं दासपाळू
कटी ठेविली सर्वदा बासरी रे
तुझी केशवा मूर्ति ही हासरी रे ।।२ ।।

यमूना नदीसी महापूर आला
परंतू तुझ्या स्पर्शमात्रे निवाला
तशी लागली माधवा आस तूझी
कृपावंत हो कामना हीच माझी ।। ३ ।।

घनश्याम तू कृष्ण लावण्यखाणी
लिला वर्णिता शीणली सर्व वाणी
सुदाम्यावरी स्नेहवृष्टी करी रे
समर्था त्वरेने मला उद्धरी रे ।।४ ।।

सदा सर्वदा मी निरोगी असू दे
बरा योग साष्टांग नेमें करू दे
अती स्वस्थ नेमस्त काया असावी
समर्था शरीरी त्रुटी ती नसावी ।। ५ ।।

मना श्रीधरा वृत्ति काही नसावी
मना श्रीधरा प्रीति तूझी असावी
निराशा भया षड्रिपूंसी हरी रे
नुपेक्षी कदा तू मला उद्धरी रे ।। ६ ।।

गितेमाजि रे वर्णिशी सव्यसाची
जगी ज्ञान विज्ञान ही शक्ति साची
तरी श्रीहरी वाढवी ज्ञानराशी
नभी चंद्रलेखाच वर्धिष्णु जैशी ।। ७ ।।

हरी मी सदा नीज कर्मे करावे
पुजेच्या प्रसादा उराशी धरावे
सदा सर्वदा प्रार्थना मी करी रे
जगच्चालका तू मला उद्धरी रे ।। ८ ।।

तनाचा भिकारी मनाचा विकारी
अहंतागुणे जाहलो भूमिभारी
तुझ्या भक्तिला प्रीतिला तू स्मरावे
तुझ्या युक्तिने मुक्तिला पात्र व्हावे ।। ९ ।।

दया श्रीहरी सर्वभूतांप्रती दे
क्षमा श्रीहरी सर्वभूतांप्रती दे
प्रिती श्रीहरी सर्वभूतांप्रती दे
परांच्या हिताची मती श्रीहरी दे ।। १० ।।

ब्रिदाकारणे राखणे तूज आहे
ब्रिदाकारणे तारणे तूज आहे
निरोगी सुखी ठेवि सर्वांसि तू रे
हरी सत्वरी तू जनां उद्धरी रे ।।११ ।।

जगी कामधेनू असा तू समग्रू
उभा कल्पवृक्षातळी काय मागू
जनांच्या सदिच्छा पुराव्या अनंता
अहो अच्युता मागणे हेचि आता ।।१२ ।।

अहंकार अज्ञान भ्रांती हरी रे
विनाशेष निर्मूलना धाव तू रे
खरा जीवनानंद भूतां कळो दे
अनासक्त सत्संग सर्वां मिळो दे ।। १३ ।।

समर्था जनीं दुःख काही नसो दे
समर्था जनीं सूख सूखे वसो दे
जनीं सर्व ऐश्वर्य कोंदाटवी रे
पुरूषोत्तमा तू जनां उद्धरी रे ।। १४ ।।

स्वधर्माप्रती मानसी प्रीति लागो
अधर्माप्रती सर्वदा क्रोध जागो
किती एक दुष्टांसि निर्दाळिले तू
तुझे विश्व हे तूचि सांभाळिले तू ।। १५ ।।

न ये मोजिता अच्युतानंद ठेवा
उदारा कृपे भूतमात्रांसि दयावा
समस्तामधे सार संचारवी रे
जगी वासुदेवा जनां उद्धरी रे ।।१६ ।।

शशी सूर्य तारांगणे सृष्टिचित्रे
स्वये निर्मिली प्रेमपत्रे विचित्रे
प्रमोदा जरी निर्मिसी चक्रपाणी
करी सार्थ भावार्थ वेदांतवाणी ।।१७ ।।

अनादी अरूपा अमोघा अमर्त्या
सवर्त्या व कर्त्या तुची विघ्नहर्त्या
अती कौतुकाने मला दान दयावे
हरीप्रार्थने आपुलेसे करावे ।। १८ ।।

अशोका अजिंक्या परब्रह्म श्रेष्ठा
तुझ्या ठायि कृष्णा असो माझि निष्ठा
अभंगा असीमा अनंता अपारा
हरीदास सेवा सुखाने स्विकारा ।।१९ ।।

शिवा सुंदरा सत्य साकार तत्त्वा
भजी जो तया सांडि वेगे ममत्त्वा
हरीदास थक्कीत होऊनि पाहे
सुखे सच्चिदानंद हे नांदताहे ।।२० ।।

हरीप्रार्थने ज्ञानविज्ञान प्राप्ती
हरीप्रार्थने सर्व व्याधी समाप्ती
हरीप्रार्थना सूटवी सर्व चिंता
हरीप्रार्थना भेटवी त्या अनंता ।। २१ ।।

।। ॐ शांतिः शांतिः शांतिः ।।

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड,
पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●

फार फार वर्षांपूर्वी धारानगरीत भोजराजा राज्य करीत होता. तो दानशूर म्हणून प्रसिद्ध होता. तसेच विद्वानांना आश्रय देणारा म्हणूनही तो ख्यातकीर्त होता. एकदा दारिद्र्याने गांजलेला एक दरिद्री ब्राह्मण आपले नशीब अजमावण्यासाठी आपले दारिद्र्य दूर होईल अशा आशेने धारानगरीत आला. भोजराजा विद्वानांची, कलावंतांची कदर करणारा आहे हे ठाऊक असल्याने आपण किमान ४ ओळींची तरी रचना करून न्यावी अशा विचाराने तो नगराजवळील एका जलाशयाजवळ जांभळाच्या झाडाखाली बसून विचार करीत होता. तेव्हा त्याला असे दिसले की पिकलेली जांभळे झाडावरून टप-टप जलाशयात पडत आहेत. तेव्हा तो मनातल्या मनात म्हणू लागला – जम्बूफलानि पक्वानि-पतन्ति विमले जले। मत्स्यास्तानि न खादन्ति। मनातल्या मनात तो आनंदी झाला. अरे वा! एका श्लोकाचे ३ चरण तर झाले की! पण ४था चरण काही केल्या सुचेना. शेवटी 'जलमध्ये डुबुक डुबुक' असे म्हणून त्याने श्लोक कसाबसा पूर्ण केला.

जम्बूफलानि पक्वानि-पतन्ति विमले जले।
मत्स्यास्तानि न खादन्ति-जलमध्ये डुबुक डुबुक।।

अर्थ – पिकलेली जांभळे स्वच्छ अशा जलाशयात पडत आहेत. मासे ती जांभळे खात नाहीत पाण्यात केवळ 'डुबुक डुबुक' म्हणजे खाली-वर खाली-वर करीत आहेत.

हा श्लोक घेवून दरबारात जाण्यापूर्वी दरबारातील श्रेष्ठ कवी कालिदासाकडे जावे. त्याला आपली रचना दाखवावी व आपली मनीषा सांगावी अशा विचाराने कालिदासाकडे आला. आपली रचना दाखविली व धन मिळवून द्यावे अशी विनंती केली.

कालिदासालाही त्याची दया आली. त्याचे दारिद्र्य दूर व्हावे असे कालिदासासही वाटले. त्याने त्या ब्राह्मणाचा श्लोक वाचला श्लोकातील फक्त ४था चरण बदलला व पूर्ण श्लोक असा झाला –

जम्बूफलानि पक्वानि-पतन्ति विमले जले।
मत्स्यास्तानि न खादन्ति जालगोलक शङ्कया।।

अर्थ – विमल-निर्मल अशा जलाशयात पिकलेली जांभळे पडत आहेत. (पण) मासे ती (त्यांना पकडण्यासाठी लावलेल्या) जांभळे जाळ्याचे ठोकळे आहेत अशी शंका आल्याने खात नाहीत. कालिदासाने त्या ब्राह्मणाला सांगितले उद्या दरबारात येवून हा श्लोक म्हण! कालिदासाने सांगितल्यानुसार त्या ब्राह्मणाने दुसऱ्या दिवशी तो श्लोक दरबारात म्हटला. श्लोक ऐकून राजा खरोखरच संतुष्ट झाला. त्याने त्या दरिद्री ब्राह्मणास भरपूर द्रव्य देवून संतुष्ट केले. ब्राह्मण घरी जाण्यापूर्वी कालिदासाचे घरी गेला. त्याच्या चरणी लीन झाला. त्याचे आभार मानले व समाधानाने आपल्या घरी गेला.

**श्रीकांत अनंत बर्वे**

●●●

भगवान श्रीविष्णूंचा ८ वा अवतार 'श्रीकृष्ण'. द्वापारयुगातील हा अवतार. या वेळचे युग वेगळे होते व त्या युगातील नीतिधर्मराजकारण समाजव्यवस्था इ. चे स्वरुप वेगळेच होते व त्याअनुसार त्यांनी जो धर्ममार्ग आचरला तो जनमानसात 'श्रीमद्‌भगवतगीता' रूपाने अक्षय कालातीत स्थान प्राप्त करता झाला व त्यांचे तत्त्वज्ञान व नीति यामुळे त्यांची प्रतिमा 'पूर्णावतार' म्हणून जनमानसात स्थान मिळवती झाली. आसेतु हिमालय ही प्रतिमा रुजली आहे व आजही त्यांचे तत्त्वज्ञान व नीति उपयुक्त ठरत आहे.

ह्या अवतारात त्यांचे शस्त्र होते – 'सुदर्शन चक्र'. त्यांची युद्धनीति ही वेगळ्याच प्रकारची होती. कारण ते नुसतेच महाबली नव्हते तर उत्तम योजक होते. संस्कृत भाषेत एक सुभाषित आहे ते असे –

''अमन्त्रा अक्षरं नासित। नास्ति मूलं अनौषधम्। अयोग्य पुरुषः नास्ति। योजकः स्तत्र दुर्लभः।।''

याचा अर्थ : असे एकही अक्षर नाही ज्याचा मंत्रात वापर करता येत नाही, असे एकही वनस्पती मूळ नाही ज्याच्यामत औषधी गुणधर्म नाहीत, असा एकही पुरुष नाही जो सर्वथैव अयोग्य आहे, पण कोणाचा कसा, कधी, कश्यासाठी, किती वेळ (कितीदा) उपयोग करावयाचा हे जाणणारा योजक दुर्मिळ आहे.

भगवान श्रीकृष्ण हे पराक्रम, योजकत्व, तत्त्वज्ञान, नीति यांचा अपूर्व संगम होतेच पण ज्ञानीही व दूरदृष्टीपूर्ण होते म्हणूनच ते 'पूर्णावतार' होते. उत्तम योद्धा, उत्तम सल्लागार हा त्यांचा मुख्य गुण. त्यांचे संपूर्ण जीवन संघर्षमय होते. बालपणी गोकुळात त्यांना संपविण्यासाठी केलेले सर्व प्रयास व्यर्थ ठरले. कारण त्यांचे ठायी असलेले विष्णूशक्तीतत्व होय. जन्म कारागृहात व बालपण गोकुळात गेले, गवळीवाड्यात म्हणा वा गोपालन समाजात. त्यांच्यातील ''ईश्वरी दिव्यशक्ती'' वेळोवेळी प्रकट झाली. त्या त्या प्रसंगात हे सहज समजते. त्यांना लहानपणी विषप्रयोग करायला पूतना राक्षसीण जेव्हा आली तेव्हा त्यांच्यातल्या ईश्वरी शक्तीने या प्रतिकूलतेवर मात केली ती अशी – त्यांनी विचार केला ही माता म्हणून आली आहे. पण विषप्रयोग करणारी आहे. धर्मसंकट उभे राहिले. एकामनाने विचार केला की दुष्टा आहे तिला दंड दिलाच पाहिजे तर माता म्हणून स्तनपान करवतेच तेव्हा मातेचा सन्मानही केला पाहिजे. भगवान श्रीकृष्णांनी दोन्ही गोष्टी पूर्ण केल्या. तिचे प्राणहरण केले. कारण ती दुष्टा होती व माता म्हणून तिला सद्‌गतीही दिली, कारण त्यांची प्रतिज्ञाच होती की, ''सन्मुख होई जीव मोही जबही। जन्म कोटी अघ नासही तबही।।'' ही सुद्धा एक रणनीतिच.

कालिया मर्दनातही त्यांनी त्याचे फणीवर नाचून त्याला शरण आणले व समुद्रात जाणेस सांगून गरूडापासून अभयही दिले, असे सांगून की गरूड तुझ्या फणीवर उमटलेली माझी पावले पाहून तुला मारणार नाही.

कंस भेटीस जातांना मथुरेत कुलयापीड हत्ती त्यांचे अंगावर घातला असता त्याचाच सुळा उपटून त्याचे गंडस्थळी (वर्मी) घाव घालून त्याचा वध केला. शत्रूवर घाव घालण्याचे नेमके कमकुवत वर्मस्थान ओळखणे ही युद्धधर्मनीति त्यांनी दाखवली तर मुष्टीक चाणूर मल्लयुद्धातही हेच तंत्र वापरले. एक कुशल बलवान सेनानी त्यांच्यात होता हेच या प्रसंगावरून सिद्ध होते. त्यांच्यातील योजकत्व येथे प्रकट होते.

हे झाले संक्षिप्तात त्यांचे बालपणाचे ईश्वरीतत्वाचे प्रदर्शन, पण खरे त्यांचे युद्धतंत्र नंतरचे काळात प्रकट झाले आहे. कंसाचे वधानंतर त्यांनी ते राज्य वारसदारांनाच दिले आहे. ह्या अवतारात त्यांनी बलरामाचा धाकटा भाऊ म्हणून राहून कर्तव्य केले आहे. भगवान श्रीकृष्णांनी नव्या युगाला उपयुक्त अशी नीति वापरली व नवे आयाम/सिद्धांत प्रस्थापित केले आहेत हे लक्षात ठेवावे. कालबाह्य रुढी, परंपरा, नीति, रिवाज, तंत्र इ. त्यांनी बदलवून नवयुगास सुसंगत प्रणाली मग ती समाजपरंपरा धर्मपरंपरा वा युद्धनीति असो यात प्रस्थापित केली आहे.

इंद्र वरुण यांची पूजा करण्यापेक्षा गोवर्धन पर्वताची पूजा करायला लावल्याने त्या देवांनी कोपाने गोकुळावर प्रचंड जलवृष्टी केली, तेव्हा करांगुलीवर गोवर्धन पर्वत उचलून त्याखाली सर्व गोकुळवासी व गायी व इतर चतुष्पादांचे रक्षण करतांना त्यांनी नवी पूजास्थान महती प्रस्थापित केलीच तसेच त्या देवांपासून जनतेचे रक्षण करून, देवांनाही पराभूत केले ही श्रीकृष्णांची अहिंसा युद्धनीतिच होती. केवळ नुसती गोवर्धन ढाल करून पर्जन्याचा सामना केला. प्रतिवार केला नाही व दुष्ट शक्तींना पराभूत केले. कोणत्या शस्त्रात प्रतिशस्त्र वापरावे याचेच हे उदाहरण.

मथुरेचा दुष्ट अत्याचारी कंस वधानंतर कंसाचे मित्र कालयवन व जरासंध यांच्या मथुरेवर आक्रमणांना तोंड देण्याची वेळ आली. ते वारंवार मथुरेवर स्वाऱ्या करू लागले. त्यांचेपैकी कालयवन याला विशिष्ट वरदान होते, त्यामुळे श्रीकृष्णांनी तो युद्धात अजिंक्य आहे हे जाणून रणांगणातून पळ काढला व एका गुहेत मुचकुंद राजा निद्रेत होता त्याचेवर आपला शेला टाकून (पांघरुन त्याचे शरीर संपूर्ण झाकले) ते लपले. कालयवन पाठलाग करत तेथे आला व त्याने श्रीकृष्ण येथे झोपलाय असे समजून लाथ मारून जागे केले व जागे झाले ते मुचकुंद, ज्यांना ईश्वराचे वरदान होते की जो त्यांना मुद्दाम जागे करील त्याचेकडे दृष्टी जाताच तो भस्मसात होईल व तेच झाले. त्यांची दृष्टी पडली व कालयवन भस्मसात झाला. मग श्रीकृष्णांनी त्यांना दर्शन देवून तपसाधना करण्यास सांगितले व तपांती ते उद्धरून गेले. ही श्रीकृष्णाची योजकत्व दाखवणारी युद्धनीति शत्रुमर्मस्थान जाणून योग्य

अस्त्राने त्याचा नाश कसा करता येतो हे त्याचे उदाहरण होय. जरासंधाबाबत त्यांची योजना वेगळी होती हे पुढे येणार आहेच.

रुक्मिणी हरणानंतर त्यांचे रुक्मिशी युद्ध झाले. त्यात त्यांनी रुक्मिला पराभूत करून अपमानास्पद करून जीवंत सोडले कारण तो रुक्मिणीचा भाऊ होता. कोणाला कसे वागवावे हा युद्ध नीतिचाच भाग असतो. भगवान श्रीकृष्णाने हे युद्धनीतिशास्त्र अचूक जाणले होते. केव्हा शत्रूस शरण आणून जीवनदान द्यावे व केव्हा त्यास जीवानिशी संपवावे हे कुशल सेनानीच जाणतो. त्यामुळे त्यांनी नरकासुराचा वध केला कारण तो नराधम होता त्याच्यावर दया दाखविण्याचे काहीच कारण नव्हते. शिशुपालाचेही शंभर अपराध सहन करून नंतरच त्याचा सुदर्शन चक्राने वध केला.

मथुरेवर वारंवार होणाऱ्या आक्रमणांपासून जनतेस त्रास होऊ नये म्हणून त्यांनी द्वारका वसवली यातही त्यांची युद्धनीति आहे. त्यांची खरी युद्धनीति दिसून येते ती महाभारतात. कारण त्यांनी ''हाती शस्त्र धरणार नाही, चार युक्तीच्या गोष्टी सांगेन'' हे प्रतिपादन केले होते, त्यामुळे अर्जुनाने त्यांनाच आपलेकडे घेतले. नुसती प्रचंड सेना असून उपयोग नाही तर रणनीतितज्ज्ञ सेनानी असला पाहिजे तरच विजय निश्चित. भगवान श्रीकृष्णांना कौरव सेनेतील महाबलस्थाने म्हणजे भीष्म, द्रोण, कर्ण, दुर्योधन इ. चे मर्मस्थान माहित होते.

पांडव वनवासात असतांनाही त्यांना अस्त्र, शस्त्र पारंगत करण्यासाठी दूरदृष्टीच्या श्रीकृष्णांनी अर्जुन, भीम, नकुल, सहदेव यांना योग्य त्या गुरूंकडे पाठवून निष्णात केले होते कारण त्यांना भविष्यकाळ पूर्णपणे दिसत होता ही पण एक युद्धनीतिच आहे. आपली कमकुवत स्थाने बलयुक्त करण्याची कारण वेळ आली तर आपण सज्ज हवेच, ही संरक्षक नीति आहे.

महाभारतात मात्र त्यांचे योजकत्व म्हणजेच छुपी युद्धनीति सर्वार्थाने प्रगट झाली आहे. एक निष्णात युद्धनीतियोजकत्व पांडवांचे पाठीशी उभे राहिले म्हणूनच पांडव जिंकले हे सत्य आहे. पांडव जरी बलशाली अस्त्रशास्त्र संपन्न होते तरी डावपेच आखणे त्यांना जमले नसते म्हणून त्यांचा सल्लागार बनून त्यांनी ते बल सुयोग्य रीतिने वापरले. या काळात त्यांनी धर्म / अधर्म, सत्य / असत्य इ.इ. चा काळानुरुप सुयोग्य अर्थ लावला व तसे तंत्र वापरले आहे ते थोडक्यात पाहू या.

युद्धारंभीच अर्जुनाला आलेले मनोदौर्बल्य त्यांनी ''भगवद्गीता'' सांगून दूर केले व त्यास युद्धप्रवृत्त केले आहे. मनोधैर्य खचलेला वीर निरुपयोगी असतो. अशा वीरांमुळे पराभवच होतो. त्याचा मोह नष्ट करणे व संभ्रमावस्था दूर करणे हा ही रणनीतिचाच भाग असतो व हेच भगवान श्रीकृष्णांनी केले.

युद्धास सुरवात झाल्यावर ही रणनीति / युद्धनीति कशी प्रकट झाली ते खालील

प्रसंगावरून लक्षात येईल.

युद्धात महापराक्रमी भीष्म, द्रोण व कर्ण यांचेवर दुर्योधनाची सारी मदार होती व हे तीन महावीर संपले की युद्ध जिंकल्यातच जमा होते. युद्ध सुरु झाले. कौरवांचे पहिले सेनापति महारथी भीष्म होते.

भगवान श्रीकृष्णांनी ''मी शस्त्र हाती धरणार नाही'' ही प्रतिज्ञा महाभारताचे युद्धापूर्वीच केली व ते अर्जुनाचे सारथी झाले. महावीर भीष्मांनी ''मी ही प्रतिज्ञा मोडावयास भाग पाडीत तरच मी खरा भागवत'' अशी प्रतिज्ञा केली. भीष्म-अर्जुन युद्धात भीष्मांचे घनघोर शर, शस्त्र वर्षावाने तो हतबल झाला व त्याचवेळी हा बाका प्रसंग जाणून श्रीकृष्णानी रथचक्र काढून ते हाती घेवून भीष्मांवर चालून जाताच तत्काळ भीष्मांनी शस्त्रे खाली ठेवली व म्हणाले, ''या भगवान, आपल्या हस्ते मी मृत्यु आनंदाने स्विकारीन. आपली प्रतिज्ञा भंग करण्याची माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली.'' येथे भगवान श्रीकृष्णांनी पण प्रतिज्ञा कोठपर्यंत ताणाव्यात याचे युद्धनीतितत्व सांगितले. एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच त्या गोष्टी असाव्यात. ''श्रीगजानन विजय'८ पोथीत एका अध्यायात ''भूतदयेच्या तत्वे भला। सर्व कोणी का पोसला। वा जागा चोरट्या। देती का सदनी कोणी।।'' ह्या ओवीत हेच मर्यादातत्व सांगितले आहे. वरील प्रसंगावरील वामन पंडितांचा माझ्या शालेय जीवनात एका इयत्तेच्या पुस्तकात सुंदर श्लोक होता तो असा :-

''प्रतिज्ञा जे केली यदुकुळवरे युद्ध ना करी।
धरी ना शस्त्राते कदनसमयी मी निजकरी।।

घडेना हे मिथ्या जरी तरी न मी भागवत रे।
प्रतिज्ञे या भीष्म करी मग घोरसंग्राम रे।।''

अहिंसा, भूतदया, अलिप्ततावाद, सज्जनता, दानशूरत्व, नीति इ. गोष्टीचा अतिरेकीचा शेवट जीवघेणा ठरू शकतो. सहनशिलता, मानवता इ. तत्वे बाका प्रसंग येताच त्यागावीच व प्रतिहल्ला करावा ही युद्धनीति येथे दिसते. शिवाय यावेळी भक्तरक्षणाचे ब्रीद ही सांभाळले गेले आहे. येथे एक गोष्ट लक्षात येईल की त्यांनी भीष्मवध केला नाही तर त्यास शस्त्रे खाली ठेवण्यास लावून पराभूत केले व त्यांचीही प्रतिज्ञा पूर्ण करून त्या दिवशीचे युद्ध संपविले.

भीष्मांना ''तुम्ही पांडवांचे कैवारी असल्यानेच तुम्ही पांडवांचा वध करत नाही'' अशी टीका दुर्योधनाने करताच ''मी उद्या पृथ्वी निःपांडवी करीन वा स्वतः धारातीर्थि पडेन'' ही घनघोर प्रतिज्ञा भीष्मांनी केली. त्यांचा पराजय करणे शक्यच नव्हते तर वध करणे दूरच. अशावेळी श्रीकृष्णांनी वेगळीच रणनीति आखली. त्यांनी द्रौपदीला पितामह भीष्मांकडे पाठवले. त्यांनी तिला ''अखंड सौभाग्यवती भव'' असा आशिर्वाद देताच तिने त्यांच्या प्रतिज्ञेची आठवण करून दिली. भीष्मांनी ते ओळखले व तिला स्वतःचे धारातीर्थि पडण्याचा / मरणाचा उपाय सांगितला व त्याप्रमाणे शिखंडीला पुढे करून त्याचे आडून अर्जुनाने शरसंधान केले. कारण

भीष्मांनी शिखंडीवर शस्त्र / अस्त्र चालवणार नाही या त्यांचे प्रतिज्ञेप्रमाणे शस्त्रे खाली ठेवली. अर्जुनाच्या शरसंधान व शरवृष्टीने ते धारातीर्थि पडले. ही योजना अप्रतिम युद्धनीतिचे उदाहरण आहे. शत्रूकडूनच त्याचा मृत्युचा मार्ग ओळखण्याची ही नीति.

याबाबतीत थोडा फरक दाखवणारी कथा ''सद्धर्म'' (जुलै २०१८ चे अंकात) पान ५ वर 'गीताकृष्णायन - भाग ५' - कुरुक्षेत्र या लेखात श्री. प्रसाद औटींनी लिहिली आहे. त्यात श्रीकृष्णांनी धर्मराजास सांगितलेल्या युक्तीनुसार रात्री ध्यानस्थ भीष्मांचे चरणास त्यांने वंदन करताच 'विजयी भव' असा आशिर्वाद देवून डोळे उघडताच समोर धर्मराज व श्रीकृष्ण भगवान शेजारी पाहून सर्व प्रकार लक्षात येवून त्यांनी 'शिखंडीस पुढे करून त्याचे आडून अर्जुनाने मजवर शरवर्षाव करावा. शिखंडी क्लीब म्हणून मी त्याचेवर शस्त्र चालविणार नाही, शस्त्रे खाली ठेवीन'' हे सांगितले. बाकी कथा वरीलप्रमाणेच. त्याप्रमाणे युद्धात भीष्म कोसळले व त्याक्षणी म्हणाले, ''श्रीहरी तुझी इच्छा प्रमाण. माझा आशिर्वाद खोटा ठरू दिला नाही व उत्तरायणात मी प्राणत्याग करतांना मुकुंदा तू जवळी हवा ही इच्छा.''

भगवान श्रीकृष्णांची ही युद्धनीति - कथेत फरक असला तरी युद्धनीति तीच आहे.

भीष्मांनंतर द्रोणाचार्य सेनापती झाले व त्यांनी रचलेल्या चक्रव्यूहात अभिमन्यूचा बळी गेला. त्यावेळी त्याचे शवाला लाथ मारणाऱ्या जयद्रथाचा वध सूर्यास्तापूर्वी करीत नाहीतर अग्निकाष्ठ भक्षण करून मरेन ही अर्जुनाची प्रतिज्ञा होती. जयद्रथ त्यामुळे युद्ध सोडून पळून जाण्यास सिद्ध झाला असतांना ''अर्जुनाचा काटा काढण्याची ही सुवर्णसंधी आहे. अर्जुनास सूर्यास्तापर्यंत तुझ्याजवळ पोहोचताच येणार नाही अशी अभेद्य फळी निर्माण करू'' असे दुर्योधनाने सांगून त्यास थांबविले. त्याप्रमाणे दुसरे दिवशी अभेद्य व्यूहरचना केली व प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही दिवस कलून गेला तरी अर्जुनास यश येईना. सूर्यास्तास काही कालावधी राहिला. तेव्हा श्रीकृष्णांनी सुदर्शन चक्राने सूर्यास झाकून सूर्यास्ताचा आभास निर्माण केला. युद्ध थांबले व अर्जुन चिता रचून आग्निकाष्ठ रक्षण करून अग्नि प्रवेशास सिद्ध झाला व हे दृष्य बघायला जयद्रथ व कौरव जमा झाले व मोठमोठ्याने टाळ्या वाजवून अर्जुनास खिजवून हर्षोल्लास करू लागले. अर्जुनास गांडीव धनुष्यास शर जोडून शरसंधान तयार अवस्थेतच अग्निप्रवेश करण्यास श्रीकृष्णांनी सांगितले होते व त्याप्रमाणे तो तयार/सिद्ध होताच, जयद्रथ तर हर्षोन्मादात सर्वात पुढे येवून अर्जुनास खिजवत होता व हाच क्षण येताच श्रीकृष्णांनी सुदर्शनचक्र काढून घेतले व अर्जुनास सांगितलेख ''हा सूर्य हा जयद्रथ'' त्वरीत शरसंधान करून याचे मस्तक उडव व ते त्यांचे पित्याचे मांडीवर पडेल असे कर'' (जयद्रथास वर होता की जो त्याचे मस्तक भूमीवर पाडील त्याचे डोके फुटून तो तत्काळ मरेल) त्याप्रमाणेच झाले.

जयद्रथाचे शीर अर्जुनाने बाणाने उडवून ते वनात ध्यानस्थ बसलेल्या पित्याचे मांडीवर पडले व त्याचा पिता उठताक्षणीच ते जमिनीवर पडले व पित्याचेहि मस्तक छिन्नभिन्न होवून तो मेला.

या ठिकाणी भगवान श्रीकृष्णांची अलौकिक युद्धनीति व ज्ञान दिसते. अर्जुनाची प्रतिज्ञाही पूर्ण केली व जर त्याचे शिर जमीनीवर पडले असते तर अर्जुनाचा मस्तकभंग झाला असता व तो मेला असता. यात जयद्रथ व त्याचा पिता दोघांचेही मृत्यू व अर्जुन प्रतिज्ञापूर्ती व त्याचे रक्षण करणारी अद्वितीय युद्धनीति भगवान श्रीकृष्णांनी दाखवली.

आता राहिला द्रोणाचार्यांचा काटा काढण्याचा यक्षप्रश्न. द्रोण कौरव पांडव दोघांचेही गुरु व अस्त्रशस्त्र विद्येचे महामेरू. उघड्या मैदानात त्यांचा सामना करणे दुरापास्त व वध तर केवळ अशक्यच. हे श्रीकृष्ण जाणून होते.

युद्धात द्रोणांनी युधिष्ठिरास निष्प्रभ केले होते जर त्यास बंदी केले असते तर युद्ध संपलेच असते. भगवान श्रीकृष्णांनी हे ओळखून तत्काळ अर्जुनाचा रथ तेथे नेला व अर्जुनाने प्रचंड शरवृष्टी करून द्रोणास माघारी जाण्यात भाग पाडले. तरीपण त्यांचा वध हे महाआव्हानच. तेव्हा त्यांचे मनोधैर्य खचून ते शस्त्रत्याग करतील तरच हे शक्य आहे म्हणून श्रीकृष्णाने पांडवांपुढे प्रस्ताव मांडला की, ''कौरवाचे बाजूने लढणारा त्यांचा पुत्र अश्वत्थामा ... पण तो तर अवध्य चिरंजीव आहे पण त्याला काही उपायांनी द्रोणांचे दृष्टीआड करून 'अश्वत्थामा' नामक हत्ती वार करायचा व अश्वत्थामा मेला ही बातमी द्रोणापर्यंत पोहोचवायची व मग ते खचून शस्त्र खाली ठेवताच धृष्टधृम्नाने त्यांचे मस्तक उडवायचे कारण त्याचा जन्मच यज्ञातून याचसाठी झालेला होता.

या नीतिप्रमाणेच घडले. ही बातमी कानी येताच उद्वेगाने द्रोणांनी युधिष्ठिरास विचारले की तू कालयत्रीही असत्य बोलणार नाहीस. अश्वत्थमा चिरंजीव आहे तो मरणे शक्य नाही तरी पण तूच सांग खरच अश्वत्थामा मेला. त्यावेळी श्रीकृष्णांचे सल्याप्रमाणे युधिष्ठिराने 'नर वा कुंजर' उद्गार काढले त्यात 'नर' मोठ्याने उद्गारला व 'वा कुंजर' हे स्वतःलाच ऐकू येतील इतक्या हळूवारपणे. त्याक्षणीच द्रोणांनी शस्त्र खाली ठेवले व हाच क्षण साधून धृष्टद्युम्नाने त्यांचा शिरच्छेद केला.

मानसिक आघात करून शत्रूचे मनोधैर्य खच्ची केले की त्याचा पराभव / वध सहज करता येतो ही युद्धनीतितील कुशलता येथे श्रीकृष्णांनी दाखविली आहे. क्रमशः

(उर्वरित लेख पुढील अंकी...)

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३
Email : vasantgod@gmail.com

(उर्वरित लेख मागील अंकापासून पुढे...)

**भारतीय विचारसरणी आणि ज्ञान**

भारतीय विचारप्रणालींत ज्ञान या शब्दाचा अर्थ पाश्चात्य विचारप्रणाली इतका साधा नाही. ज्ञान म्हणजे काहीतरी वैदिक अथवा नैसर्गिक शास्त्राबाबतची सत्य माहिती की ज्यामुळे न की केवळ काहीतरी अडचण दूर होऊ शकेल पण समाजाचे अकल्याण होणार नाही. जर कोणाला काहीतरी कठीण वस्तू तोडायची असेल व तसे ज्ञान कोणा ज्ञानी माणसाला विचारले असेल तर स्फोटकाबद्दल तो माहिती काढण्यापूर्वी ती वस्तू तोडण्यामागे हेतू काय आहे त्याची त्या ज्ञानी माणसाला खात्री करून घ्यावी लागेल व जर काही दुष्ट हेतूने स्फोटकाची आवश्यकता नसेल तरच तो ज्ञानसागराकडे जाण्याचा प्रयत्न करील. भारतीय तत्वज्ञानाच्या दृष्टीने ज्ञान म्हणजेच सत्य माहिती (मग ती भूतकाळांतील घटनांची असो, वर्तमानांत घडणारी असो अथवा भविष्यकाळांत घडणारी घटना असो) आणि ऊर्जा याचा एक प्रचंड महासागर विश्वांत (Cosmos) पसरलेला असतो. तेथे पोहोचण्याची वाट केवळ उच्च चैतन्यांतूनच (Higher Consciousness) सापडते. तशी ती प्रत्येक माणसांत असतेच. तो प्राणी शुद्ध हृदयाचा, अध्यात्म्याचा विद्यार्थी आणि उच्च चैतन्यांत वावरणारा असावा लागतो तरच त्याला त्या महासागराची वाट मिळू शकते मग जवळच्या संयमाने तो महासागरांतील हव्या त्या विभागांत पोहोचून तेथील ज्ञान मिळवू शकतो, कारण तो ज्ञानी असतो.

सचेतन प्राणि एकंदर ७ प्रकारच्या चैतन्यांत किंवा जाणिवांत असू शकतो. या ऐहिक जगतांतील प्राणी सहसा कनिष्ठ अशा जागृत (Waking), सुषुप्ती (Sleeping) आणि स्वप्न (Dreaming) अशा तीन जाणिवांतच वावरत असतो. केवळ मनुष्यालाच ऊच्च जाणिवांत जाता येते, त्या जाणिवा आहेत; भावातीत (Transcendental), वैश्विक (Cosmic), ईश्वरीय (God) आणि एकीकृत (Unity). भावातीत ही जाणीव कनिष्ठ आणि ऊच्च जाणिवांमधील केवळ एक सांधा आहे. कोणीही प्राणी फारकाळ या सांध्यावर राहू शकत नाही. कनिष्ठ जाणिवेतून उच्च जाणिवेत जायचे असले तर भावातीत जाणिवेतूनच पुढे जावे लागते. भावातीत जाणिवेंत असतांना साधक मधूनमधून वैश्विक जाणिवेंत जातो पण तेथे स्थिर झाला नाही तर जागृतावस्थेत घसरतो. त्याचा भावातीत अवस्थेचा पुरेसा अभ्यास झाला की वैश्विक जाणिवेंत त्याला स्थिरता प्राप्त होऊ शकते व पुढील प्रवास होऊ शकतो. हा प्रवास सुरू करण्यास निदिध्यान (Meditation) हा मार्ग आहे.

ज्ञान म्हणजे (अंतिम) सत्य. 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' या जगांत ज्ञानासारखी पवित्र दुसरी गोष्ट नाही. त्यामुळे

ज्ञानी म्हणवणाराचे हृदय पवित्र असलेच पाहिजे, नव्हे ती त्याची ज्ञानी बनण्यासाठीची प्रथम पात्रता आहे. एखाद्या विषयांत आलेली अडचण दूर करण्यास त्यामुळे प्रत्येकवेळी ज्ञानाचीच आवश्यकता असेल असे नाही पण ज्ञानी माणूस कोणतीही अडचण दूर करू शकेल यांत काही शंका नाही. ज्ञान म्हणजे स्व-रूप जाणणे असे वेद म्हणतात त्यांत काहीही खोटे नाही. जर कोणी स्वतःला जाणले तर तो परम स्थानाला पोचतोच आणि हे परम स्थान त्या ज्ञान, शक्ती आणि सत्यमहासागराचे किना-यावरच असते. त्याची उच्च जाणीव तेथेच स्थिर झालेली असते मग त्याला काय ज्ञान असणार नाही?

ऐहिक जगांतील प्राणि जोपर्यंत निसर्गाबरोबर रहातात तोपर्यंत निसर्ग या ज्ञान महासागरातले त्या प्राण्यांना आवश्यक असलेले ज्ञान त्यांच्या मनापर्यंत पोचवतो मग ते प्राणी कनिष्ठ जाणिवेंतच का असेनात. डिसेंबर २००४ मधील त्सुनामी लाटांनी उडवलेल्या भारतीय महासागरपरिसरांतील देशांतील हाहाःकाराचेवेळी अंदमान/निकोबार बेटांवरील जंगलांत रहाणारे ओंगी व जारवासारखे आदिमानवसमुदाय आणि श्रीलंका आणि थायलंडमधील कनिष्ठ जाणिवेंतच रहाणारे प्राणि यांना या संकटाची निसर्गाने आगावू जाणिव करून दिल्यामुळे त्याच्यापैकी एकाचाही जीव गेला नाही ही गोष्ट जगजाहीर आहे. आधुनिक शिक्षण घेतलेल्या विज्ञानी माणसांचे मात्र (निसर्गापासून ते दूर गेलेले असल्यामुळे) या संकटाने दोन लाखावर बळी घेतले हेही सर्व जाणतातच. त्सुनामीसारख्या नैसर्गिक आपत्तींची कारणे सारीच गोचर नसल्यामुळे अशा आपत्तींची निसर्गाच्या मदतीशिवाय शतप्रतिशत आगावू जाणीव होऊ शकत नाही. विज्ञान हा ज्ञानाचा एक हिस्साच असल्यामुळे (दुसरा हिस्सा म्हणजे 'प्रतिभा' किंवा इंग्रजींत Intuition) विज्ञानांत प्राविण्य मिळवणाराही संपूर्ण ज्ञानी होऊ शकत नाही. भूकंप, वादळें व ज्वालामुखीसारख्या नैसर्गिक आपत्तींचेवेळी सहसा पशु आणि (विज्ञान न शिकलेले पण निसर्गाशी तादात्म्य पावलेले) वन्य मानवजमाती यांची जीवितहानी कमी होते ही आता सर्वमान्य बाब आहे.

भारतीय तत्वज्ञानाच्या दृष्टीने जाणिवेच्या बाबतींत माणसाचे चार प्रकार पडतात; अजाण, अविद्यावान, विद्यावान आणि ज्ञानी. सा-या माणसांना आर्य म्हणजे श्रेष्ठ मानव बनवण्यासाठी भारतीय संस्कृतीची 'कृण्वंतो विश्वमार्यम्' ही हांक असल्यामुळे सर्व ज्ञानी व्हावेत असा भारतीयांचा प्रयत्न असतो. अजाण लोकांना वेदविद्या शिकवून विद्यावान करण्यासाठी गुरुकुलें होती. विद्यावान माणसांना त्या विद्येमुळे (सततच्या अष्टांगयोगाच्या अभ्यासातून) सहसंवेदनेने स्वतःच्या मनामधील ज्ञानसागराकडे जाणारा मार्ग दिसू शकतो व हळूहळू तो माणूस ज्ञानी होतो. प्रश्न पडतो तो अविद्यावानाचा. अविद्यावान म्हणजे चुकीची विद्या ग्रहण करून बसलेले. सत्य गोष्टींना असत्य आणि असत्य गोष्टींना सत्य मानत रहाणारे हे लोक असतात. त्याना ज्ञानी बनवायचे तर प्रथम त्याची

अविद्या नष्ट करावी लागते व त्यांना अजाण करावे लागते, मग त्यांना विद्यावान करून ज्ञानी बनवता येते. जे अडाणी असतात व जंगलांत निसर्गाशी मिळूनमिसळून रहातात त्याना निसर्गच त्यांना हव्या असलेल्या ज्ञानसागरातील विभागाकडे पोचवून आवश्यक ज्ञानाची जाणीव करून देतो व त्यांच्यापुरता ज्ञानी करून सोडतो. ज्ञानी झाला की त्या माणसाला आपले जीवन सुखाने व्यतीत करण्यांत काही मोठ्या अडचणी येत नाहीत. हीं माणसे शिकलीसवरलीच काय पण लिहितावाचता न येणारी असली तरी चालते पण निरागस (Innocent) मात्र असली पाहिजेत. त्याच्या मानसातील ज्ञान महासागराला जोडणारे सांधेमार्ग निसर्ग योग्य प्रकारे जोडलेले ठेवतो.

माणूस जेव्हा जन्माला येतो तेव्हा तो निरागस असतो, निसर्गाच्या सर्वात जवळ असतो. इतर पशु-पक्षी कधीच निसर्गापासून दूर जात नाहीत, पण माणूस कर्मयोनीतील जीव असल्यामुळे, त्याला जे वाटेल ते तो अंमलांत आणन्याचे काम सुरू करू शकतो त्यामुळे ब-याचदा तो निसर्गाच्या विचारसरणीपासून दूर जातो. मग निसर्ग माणसाच्या निरागसतेच्या काळांत त्याच्याशी ठेवलेले संपर्क तोडून टाकतो. माणूस निसर्गापासून दूर गेला की सत्यापासून म्हणूनच ज्ञानापासून दूर जातो. त्याने 'स्व-रूप' जाणले तर तो आपले निसर्गाशी असलेले नाते पुन्हा प्रस्थापित करू शकतो, आणि ज्ञानी बनू शकतो. माणूस आपल्या इंद्रियांच्या जोरावर विज्ञान जाणून घेऊ शकतो पण ज्ञानांत विज्ञानाखेरीज प्रतिभेचाही वाटा असतो व तो मात्र निसर्गाजवळच असतो. निसर्गाशी संधान बांधल्याखेरीज प्रतिभेची जाणीवही होऊ शकत नाही, त्यामुळे ज्ञानी होणे दूरच.

माणुस निरागस असतांना त्याला (ज्ञानी होण्यासाठी) विद्या मिळवावी लागते. माणसाला माहिती ब-याच प्रकारे मिळू शकते; पुस्तके वाचून, गुरूकरवीं शिकून, दूरवाणी अगर दूरदर्शन आणि वृत्तपत्रासारख्या माहितीमाध्यमातून वगैरे. त्या माहितीचा त्याने (सतत) सराव किंवा अभ्यास चालू ठेवला तर त्याला विद्या प्राप्त होते. ब-याचदा तो सराव करताना ती माहिती सत्यच आहे वा त्याचा सराव योग्य रीतिने चालला आहे हे निश्चित करण्यासाठी त्याला गरूची आवशकता भासू शकते. या विद्येच्या मदतीने तो आपल्या मानसांत असलेल्या ज्ञानसागराच्या वाटेवर पोहोचू शकतो व ज्ञानी बनू शकतो. हा ज्ञानी बनण्याचा एक वेदमान्य मार्ग आहे. माहितीचा सराव करतांना माणसाने ही खात्री करून घेतली पाहिजे की त्याला विद्याच मिळते आहे. कित्येकवेळा ती माहिती पूर्णसत्य नसते व मग त्याचा सराव करीत राहिल्यावर माणूस अविद्यावान होतो. मश्ड्रेक ख-या माहितीच्या सरावाने विद्यावान झाला तर त्याचा भाऊ ल्युसीफर चुकीच्या माहितीच्या सरावाने अविद्यावान बनला. मश्ड्रेकने समाजाला सुखी करण्यांत आनंद मानला तर ल्युसीफरने समाजाला दुःखी करण्याचा चंग बांधला. तो अविद्यावान असल्यामुळे हेच

तो करू शकला व ज्ञानी होऊ शकला नाही. गॅलिलीओने पृथ्वीच्या सूर्याभ्रमणाबद्दलची विद्या मिळवली, पण चर्चमधील सत्ताधीश पाद्री मंडळी पृथ्वी केंद्रस्थानी असून सूर्य तिच्याभोवतो फिरतो या अविद्येचेच जाणते असल्यामुळे त्याचा अतोनात छळ झाला ही सर्वश्रुत गोष्ट आहेच.

या ज्ञानमहासागरांत निसर्ग अथवा वैदिक शास्त्राचे संपूर्ण व त्रिकालज्ञान आहे व त्यांतच गणित, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, शरीर व आरोग्यशास्त्र आदि विभाग आहेत त्यात त्या विषयांतील ज्ञान मिळू शकते. महाभारत युद्धाच्या दरम्यान धर्मराजाकडून अश्वत्थामा (नरो वा कुंजरो वा) मेल्याची वार्ता मिळताच युद्धभूमीवरच द्रोणाचार्यांनी (अश्वत्थामा चिरंजीव असतांना कसा मारला गेला त्या) प्रत्यक्ष घटनेचे ज्ञान करून घेण्यासाठी ध्यान करीत उच्च जाणिवेत जाण्याचा प्रयत्न केला होता आणि त्यांच्या या शस्त्रविना स्थितीचा फायदा घेऊन शिखंडीने त्यांचा शिरच्छेद केला ही घटना सर्व भारतीय जाणतात. त्याचप्रमाणे जयद्रथवधाचेवेळी 'जयद्रथाचे डोके जो भूमीवर पाडेल त्याच्याच मस्तकाचे शंभर तुकडे होतील' असा शंकराचा वर असतांना अर्जुन श्रीकृष्णाच्या मदतीने कसा काय त्याचा सूर्यास्तापूर्वी वध करणार त्याची माहिती घेण्यासाठी सिंधुराज जयद्रथाचे वडील वृद्धक्षत्र यांनी भर रणांगणावरच ध्यान करण्यास सुरुवात केली आणि अर्जुनाचे काम कसे सोपे झाले हे महाभारताच्या अभ्यासूंना सांगायला नकोच.

योग्य व सत्य माहिती अशी अभ्यासात राहिले तर विद्या मिळवता येते. त्याचा सराव करून जी विद्या मिळेल तिचा जर संग्रह करून ठेवला व आवश्यक पडेल तेव्हा अशा ज्ञानकोशाशी संपर्क करून ज्ञानी होता येणार नाही का? त्याचेही उत्तर प्रसिद्ध राजकारणी विष्णुगुप्त ऊर्फ चाणक्य यांनी आपल्या 'अर्थशास्त्र या ग्रंथांतील सोळश्नाव्या अध्यायांतील शेवटच्या श्लोकांत 'नाही' म्हणून देऊन ठेवला आहे,

पुस्तकेषु च या विद्या परहस्तेषु यद्धनम् ।<br>उत्पन्नेषु च कार्येषु न सा विद्या न तद्धनम्।।२०।।

पुस्तकांत असलेली विद्या आपले धन दुसऱ्याकडे (ठेवायला) दिल्यासारखेच असते. जेव्हा आवश्यकता पडेल तेव्हा पुस्तकांतील विद्या किंवा दुसऱ्याजवळील धन मुळीच उपयोगी पडत नाहीत. म्हणजेच विद्या आत्मसातच करावी लागते. संदर्भ ग्रंथांत बंद केल्यामुळे तिचा उपयोग करणे कठीण असते. थोडक्यांत, ज्ञान अथवा विद्याबाड ही संकल्पना उपयुक्त नाही. आवश्यक असेल तेव्हा ज्ञानी माणसाकडेच अडचणीवरील उपाय विचारला पाहिजे.

**दृष्टांत**

याबाबत सुमारे ५५ वर्षापूर्वीची हकीकत मला सांगितल्याखेरीज रहावत नाही. आमच्याकडे ७-८ गाई-म्हशी होत्या व त्यांना दिवसभर गावाबाहेरील कुरणांत चरण्यासाठी सोडावे लागे व सायंकाळी परत घरी आणावे लागे. हे बरेच दिवस चालू होते व पुढे तीं गुरें आपल्याआपण परत घरी येऊ

लागली होतीं, आणि आम्हां मुलांचे काम जरा सोपे होत होते. साऱ्या गुरांपैकी एक धूराच्या रंगाची भुरी म्हैस मात्र वर्षातून दोन-तीनदातरी इतर जनावरांबरोबर घरीं पोचत नसे. मग मी व माझे वडील तिला शोधण्यासाठी कुरणाकडे जात असू. नच सापडली तर तेथेच एका झाडाखाली शेंदूर लावलेल्या दगडदेवाची पूजा करीत असलेल्या देवऋषीला गाठून त्याला तिचा पत्ता विचारत असू. आपल्याजवळील पाटीवर काही आकृती आणि आकडे लिहून तो ध्यानांत (Trance) जाई आणि ४-५ मिनिटांनी डोळे उघडी व सांगे,'बामणा, तुझी म्हस इथून दक्षिणेला (किंवा पूर्वेला, अगर पश्चिमेला) एका कोसावर (अगर दीड किंवा अडीच-तीन मैलावर) चरतांना दिसते आहे, ती घेऊन जा' आणि लगेच आपल्या पूजेंत मग्न होई. मग आम्ही तेथे जात असू आणि प्रत्येक वेळा ती म्हैस त्याने सांगितलेल्या जागेच्या आसपासच मिळायची. त्याने आमच्याकडे पैसे कधीच मागितले नाहीत, आम्हीच कधी त्याला खायचे जिन्नस नाहीतर एखाद्या रुपायापर्यंत रक्कम देत असू. मी ४-५ वेळांतरी हा अनुभव घेतला आहे.

मी ७-८ वर्षाचा असतांना भाद्रपद महिन्यांत गावातील कित्येक घरीं (आणि देवीच्या देवळांतूनसद्धा) महालक्ष्मीची पूजा व्हायची व सायंकाळी आईबरोबर आम्ही मुलेही तेथे जागायला जात असू. ९-१० वाजता पेंग येऊ लागली तर आईला सांगून तिच्याबरोबरच घरी परतत असू. संध्याकाळी देवीच्या पुजेनंतर तिच्यासमोर सवाष्ण बायका घागरी (हातांत घेऊन) फुंकत नाचत असत. त्यापैकी काहीं बायकांच्या 'अंगांत येत' असे. कित्येकवेळां त्या घागरींतून कुंकू निघत असे आणि घागरी न फुंकणाऱ्यांपैकी काहीजणी त्या बायकांना काही घरगुती व खाजगी प्रश्न विचारीत आणि घागरी फुंकता फुंकताच त्या काहीतरी उत्तरे देत असत. ती उत्तरे पुष्कळदा बरोबर असत असे प्रश्न विचारणाऱ्या बऱ्याचवेळा सांगत. हाही प्रकार वर सांगितलेल्या देवऋस्षीसारखाच असणार. तीं उत्तरे निसर्गच त्या घागरी फुंकणाऱ्या निरागस बायकांच्या मनाच्या द्वारे त्या ज्ञानमहासागरांतून कळवत असणार. आम्हा मुलांना त्या घागरी फुंकणाऱ्या बायकांची भीती वाटे म्हणून हे सारे आम्ही शेजारच्या खोलींत लपून पहात असू जर तोपर्यंत जागे राहिलो तर.

ज्ञान म्हणजे केवळ काही काम करतांना आलेल्या अडचणीचे उत्तर एवढेच नव्हे, तर त्यातून समाजाचे काही अहित होता कामा नये. त्यामुळे उत्तरे सांगणाऱ्या ज्ञानी माणसावरही काही बंधने येतात. समजा त्याने त्या अडचणनिवारणाच्या कार्याने समाजाचे अहित होते आहे ही खात्री करून घेतली नाही व अडचण निवारण्यासाठी कार्यक्रम सांगितला; त्यानंतर जर समाजाचे काही अहित घडले तर त्याची जबाबदारी त्या ज्ञानी माणसावरही पडेल व त्याने कष्ट घेऊन आपल्या मानसातून ज्ञान महासागराजवळ पोचणारी वाट मिळवली होती ती परत हरवेल. त्याला पुन्हा कष्ट करून ती

शोधावी लागेल. या कष्ट घेण्याच्या प्रकारालाच भारतीय तत्वज्ञान तप करणे असे म्हणते. ज्ञान म्हणजे केवळ एखाद्या वस्तूबद्दलची वा रीतिबद्दलची (अगदी खरीही) माहिती नव्हे. ती वस्तू वा रीत, तो ज्ञान मिळवण्याची इच्छा धरणारा आणि ते ज्ञान मिळवण्याची तो जी पद्धत वापरत असेल अशा तिघांचे मीलन असा त्याचा अर्थ असतो. ज्ञान मिळवणारा आणि त्याची ज्ञान मिळवण्याची पद्धत त्या त्रिपुटांत समाविष्ट असल्यामुळे ज्ञान त्या माणसावरही अवलंबून आहे व पद्धतीवरही विसंबून असते. काय अडचण आहे व ती कोणाला आहे यावरही तिच्या निवारणाचे ज्ञान अवलंबून असते.

जीवनांत येणारी अडचण निवारण करण्यासाठी लागणारे ज्ञान (एखाद्या ज्ञानी माणसाने) कसे जमवले असेल? तप करून वैदिक शास्त्राचा औपपत्तिक पाठांतर आणि प्रायोगिक (Theory and Practice both) दोन्ही करीत गुरुगृही राहून त्यांच्या उपदेशाप्रमाणे वागून एखादा ज्ञानी होऊ शकतो. प्रयत्न करून कष्टसाध्य राजयोगाद्वारे उच्च जाणिवांत स्थिर होऊन ज्ञानमहासागराचा मार्ग आणि हवे असलेल्या ज्ञानसागरातील हिस्सा मिळवण्याची किल्ली मिळवूनही कोणी ज्ञानी होऊ शकतो. या दोन्ही ज्ञानी मंडळींची मनें चांगलीच विकसित झालेली असतात व सहसा त्यांच्या हातून कुकर्म होत नाही. अजाणताही काही पातक घडले तर राजयोगाची पुनः आवर्तन करण्याची पाळी येणार याची त्यांना जाणीव असते. आणखी एक ज्ञानी बनण्याचा प्रकार म्हणजे संपूर्ण निरागसतेने निसर्गात एकरूप होऊन रहाणे. हा ज्ञानी विद्वान नसतो पण त्याला आवश्यक तेवढे ज्ञान निसर्गच त्याच्य मनांत पोचवतो. हा निरागस ज्ञानी दुसऱ्याची ऐहिक अडचण दूर करू शकेलच हे निश्चित सांगता येत नाही कारण निसर्गाला पटले तरच ती अडचण या ज्ञानी माणसाची आहे असे कळून निसर्ग त्याविषयींचे ज्ञान त्या निरागसाचे मनात पोचवणार नाहीतर नाही. वर उल्लेख केलेले देवऋस्षी आणि सवाष्ण यांची परिस्थिती या निरागस ज्ञान्यासारखी असेलच असे नाही (जरी त्यांना काही शिक्षण मिळालेले नसले वा त्यानी काही तप न करतां ते ज्ञानीपण प्राप्त केलेले दिसत असले तरी) मागील जन्मांत त्यानी गुरुकडे अथवा तप करून स्वतः ज्ञान प्राप्तीचा प्रयत्न सुरू केला असणार व तो यशस्वी होण्यापूर्वी त्याचे निधन झाले असणार एवढेच.

### अध्यात्मिक ग्रंथातील संदर्भ

भारतीय तत्वज्ञानानुसार ज्ञान केवळ जीवनातील अडचण दूर करण्याचे साधन नाही. कोणी रोगी घरी आला आणि वैद्यबुवांनी त्याला तपासून योग्य औषधोपचार करून बरे केले तरी त्या वैद्यबुवांना ज्ञानी म्हणता येणार नाही. आपण सहसा असेच ऐहिक आवश्यक शास्त्र माहिती असणाऱ्याला ज्ञानी समजतो. एखादा कितीतरी परीक्षांतून चमकदार यश मिळवतो, त्यामुळे आपण त्याला ज्ञानी समजतो. ज्ञानी कोणाला समजावे किंवा ज्ञान कशाला म्हणावे यापेक्षा कोणती गोष्ट ज्ञान नाही व कोणाला

ज्ञानी म्हणता येत नाही हे सांगण्यासाठी स्वामी समर्थांनी आपल्या दासबोध या ग्रंथांत ५ व्या दशकांतील ५ वा 'बहुधाज्ञान निरुपण' हा समास वापरला आहे. त्यांत ३० श्लोक वापरले आहेत चातुर्यपरीक्षा करता येत असेल, लेखन परीक्षा करता येत असेल, चौदा विद्या आणि सगळ्या कला येत असतील तरीही (आपल्याला सहसा वाटते की तेच ज्ञान आहे) ते ज्ञान नाही हे समर्थांनी स्पष्टपणे सांगितले आहे. संपूर्ण पांचव्या समासांत प्रत्येक श्लोकांत कोणती गोष्ट (सहसा आपणांस तीं ज्ञान आहे असे वाटत असले तरी) ज्ञान नाही हे अगदी सरळ शब्दांत समर्थांनी सांगितले आहे. मग ज्ञान कशाला म्हणायचे व ज्ञानी कोण हे कसे ओळखावे यासाठी सहावा 'शुद्धज्ञान निरुपण' हा समास श्री समर्थांनी वापरलेला आहे.

ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान ।।
पहावे आपणासि आपण। या नाव ज्ञान ।।१।।

आत्मदर्शन हेच ज्ञान आणि ज्या माणसाला आत्मदर्शन झालेले आहे तो ज्ञानी असे या समासांत पहिल्याच श्लोकांत स्पष्ट केले आहे. इतर श्लोकांतून आत्मदर्शन म्हणजे काय आणि आत्मदर्शनामध्ये कायकाय साध्य होते हे सांगितले आहे थोडक्यांत म्हणजे आत्मदर्शन म्हणजे काय याचे सुस्पष्ट विवरण केलेले आढळते. आत्मदर्शन म्हणजे आपण वर वर्णन केलेल्या उच्च जाणिवेंत स्थिर रहाता येण्याइतपत अध्यात्मात प्रगती झाली असली पाहिजे. आपला आत्मा परमात्म्याचाच हिस्सा आहे याची जाणीव होणे म्हणजे आत्मदर्शन. आपल्या मनातील ज्ञानमहासागराकडे जाणारी वाट स्पष्ट दिसू लागते व त्यामुळे आपण ज्ञानी बनू शकतो. सार्वत्रिक माहिती, ज्ञान आणि शक्तीचे भांडार आपणास खुले होते. थोडक्यांत म्हणजे साऱ्या निसर्गशास्त्राचे ज्ञान आपणास होते त्यामुळे कोणत्याही ऐहिक बाबीतील अडचण दूर करणे सहजसाध्य होते अर्थातच आपण ज्ञानी होतो.

श्रीमद्भगवद्गीतेच्या १३ व्या अध्यायांतील श्लोक ७ ते १० या चार श्लोकांत ज्ञानी होण्यास पात्र माणसाचे गुणवर्णन आहे.

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षांतिरार्जवम् ।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ।।७।।

इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ।
जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ।।८।।

असक्तिरनभिष्वाङ्मः पुत्रदारगृहादिषु ।
नित्यंच समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ।।९।।

मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ।।१०।।

क्रमशः

(उर्वरित लेख पुढील अंकी...)

**मेजर मु. दि. आपटे**
३२, रक्षक सोसायटी,
औंध कँप पोस्ट ऑफिस,
पुणे - ४११०२७

●●●

**शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे।**
**वसिष्ठापरि ज्ञान योगेश्वराचे।**
**कवी वाल्मीकासारखा मान्य ऐसा।**
**नमस्कार माझा सद्गुरु रामदासा।।**

समर्थ रामदास स्वामींचे हे यथार्थ गुणचित्र होय. रामनवमीस जन्म यातच त्यांच्या जीवनाचे गूढ दडलेले दिसते. 'चिंता करतो विश्वाचि' हे आईला बालपणी दिलेले उत्तर रामांची व्यापकता सिद्ध करते. मौंजी बंधनानंतर अशा व्यापक व उदार व्यक्तिस नव्हे नव्हे विभूतीसच प्रत्यक्ष परमात्मा, परब्रह्म सगुण साकार रुपात 'श्रीरामचंद्र' बनून दीक्षा व गुरुमंत्र देतो. अन् अशीच व्यक्ती आपले 'शुभ' तथा 'मंगल' सर्वार्थाने कशात आहे हे जाणून खऱ्या अर्थाने 'सावधान' होते अन् केवळ १२ व्या वर्षी विवाह मंडपातून पलायन करते ते पलायनवादी नव्हे तर 'तत्त्ववादी' होण्यासाठी.

१२ व्या वर्षी - इतक्या कोवळ्या वयात 'टाकळी' येथे गंगा-गोदावरीत उभे राहून गायत्री पुरश्चरणाने-सूर्योपासनेतून आत्मिक व शारीरिक बल संपन्नता मिळविली. त्याच समवेत ज्या राघवाने अनुग्रह दिला त्याच्या नामजपाचा-'श्रीराम जयराम जयजय राम' या त्रयोदशाक्षरी मंत्राचा १३ कोटी जप पूर्ण केला. दुपारी ब्रह्म यज्ञानंतर माधुकरी मागून तोच श्रीरामास नैवेद्य दाखवून प्रसाद ग्रहण करीत. अन् त्यानंतर वेद-वेदान्त-रामायण-भागवत-महाभारत पुराणे आदि अनेक संत वाङ्मय ग्रंथांचा सखोल अभ्यासही करीत. या बारा वर्षांच्या खडतर तपाने नारायण खराच 'जगन्नारायण' बनला.

संपादन केलेले ज्ञान मानवी निरीक्षणाने परिपूर्ण करण्यासाठी समर्थांनी या तपश्चर्येनंतर भारताची आसेतू हिमालय पायी यात्रा संपन्न केली. हिमालयात बदरीनारायण व केदारनाथ येथे त्यांना ध्यानस्थ मारुतीचे दर्शन झाले. हिमालयातील थंडी या रामदासाला बाधू नये म्हणून (दुसऱ्या रामदासाने) मारुतीने त्यांना टोप, वल्कले, हुरमुजी रंगाची वस्त्रे, मेखला, जपमाळ व खडावा प्रदान केल्या. त्या रामदासी वेशात 'मानस सरोवर प्रदक्षिणा' करून समर्थ परतले अन् हाच हुरमुजी रंगाचा वेश त्यांनी (कफनी) कायम ठेवला. या त्यांच्या तीर्थाटनात समर्थांनी अनेक साधू-संतांच्या भेटी घेतल्या जवळून त्यांचे दर्शन सत्संगाचा लाभ घेतला. लोकांची मोंगलाईतली ससे-होलपट, सामाजिक रुढी परंपरेतील स्त्रियांचे विशेषतः बालविधवांच्या हाल-अपेष्टा, दास्यत्व अंगी मुरल्याने पुरुषांचे मानसिक-नैतिक खच्चीकरण सारे सारे जवळून पाहिले, अन् याचेच दाखले आपल्याला त्यांच्या सर्वही ग्रंथात विशेषतः दासबोधात स्पष्ट उमटलेले दिसतात.

अन् अशा हीन-दीन बुडत्या अवकळा आलेल्या समाजाला नव्याने उभारी, उत्साह व बुद्धी आणि बळ देण्यासाठी भारतभर वीर मारुती, प्रताप मारुती व दास मारुतीची अगणित मंदिरे स्थापन करून 'जय जय रघुवीर

समर्थ' या धर्ममर्यादा पुरुषोत्तम राम प्रभूंची प्रेरणा जनमानसात भरून ठेवली याचाच परिपाक म्हणजे शिवाजीसारख्या सर्वगुण संपन्न व हिंदुत्वाने भरून भारुन गेलेला 'सच्छिष्य' समर्थांना लाभला आणि शेवटी शेवटी श्रींच्या साम्राज्यात 'आनंदवन भुवन' उभे राहिले.

श्री शुकदेव हे वैराग्याचे मेरुमणी होत. अवधूत वा दिगंबरावस्थेत राहणारे मायेच्या आवरणात गुंतणेच नको म्हणून गर्भातून १२ वर्ष बाहेरच न येणारे अन् बाहेर येताच वनाकडे प्रस्थान करणारे हे वैराग्य संपन्न - यांचाच उत्तम वस्तुपाठ गिरविणारे म्हणून १२ व्या वर्षापासून घरदार सोडून 'निःसंग' राहणारे समर्थ हे पूर्ण विरागीच होत.

आपल्या शुद्ध बीजाने साक्षात रघुनाथाचा अनुग्रह मिळवून त्यानंतर त्या सबीज नामाचा भलामोठा वटवृक्ष करणारे, वेदविद्या संपन्न व तपःपूत असे समर्थ, वसिष्ठांप्रमाणेच योगेश्वर ज्ञानी झाले. समर्थांची अगणित ग्रंथसंपदाच याची साक्ष देते.

कवी म्हणजे नुसते काव्य करणारा नव्हे तर वेद-वेदांगांचा सर्व शास्त्र ग्रंथांचा सांगोपांग, सखोल अभ्यास करणारा विद्वान होय. अद्वैत वेदांताची प्रचिती देणाऱ्या आत्माराम, सोलीव सुख व दासबोधापासून सर्व सामान्यांच्या पचनी पडणाऱ्या 'मनोबोध' तथा 'मनाचे श्लोक' यावरुन समर्थांचे पांडित्य सहजी ध्यानी येते.

'आधी केले मग सांगितले' सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जे करील तयाचे। परंतु तेथे अधिष्ठान पाहिजे भगवंताचे या साऱ्या उक्ती आचरणात आणीत जे जे आपणासी ठावे। ते ते इतरांशी शिकवावे। शहाण करून सोडावे सकल जन' यानुसार समर्थांच 'सद्‌गुरुपण' ही सिद्ध झालेच आहे.

अंबाजीचा कल्याण, उद्धव, वेणाबाई, अक्काबाई अशा अगणित शिष्योत्तमांना समर्थांनी स्वतः समान समर्थ बनविलेले आपण आजही पाहतो. रुढी-परंपरांनी गांजलेल्या काळात बालविधवेला समर्थपणे 'महंत वा मठाधिपती' करणारा हा क्रांतदर्शी संत होय.

ह्याच सद्‌गुरुंच्या शिष्याने ह्याच क्रांतदर्शीपणाने 'बजाजी निंबाळकर' या जबरदस्तीने बाटवून मुस्लीम बनवलेल्या आपल्या मेहुण्याला हिंदू करून घेऊन, आपली मुलगी देऊन, रोटी-बेटीचा व्यवहार ही रुढ करून दिला. इतकेच नव्हे तर गागाभट्टांसारख्या शास्त्री-पंडितांना धर्मग्रंथात अशा प्रकारे जबरदस्तीने धर्मांतर केलेल्या व्यक्तीस त्याच्या इच्छेनुसार पुन्हा हिंदुधर्मात घेण्याविषयी-धर्मशास्त्रात नवीन सुधारणा करावी अशी सुयोग्य सूचना केली. राम-कृष्णानंतर रामाप्रमाणे शुद्ध आचरणाचा व योग्य प्रसंगी कृष्णनीतीचा सुयोग्य पद्धतीने वापर करणारा हा 'शिवराय' समर्थांप्रमाणेच 'प्रातःस्मरणीय' बनला. म्हणूनच तुलसीदास म्हणतात ते अक्षरशः सत्यात उतरलेले समर्थांचे स्वप्न म्हणजे शिवछत्रींचे हिंदु-श्रींचे स्वराज्य

'रामदास रामाहूनि मोठे' 'रामसे अधिक रामकर दासा।'

।।जय जय रघुवीर समर्थ।।

**सौ. रेखा पटवर्धन**
(प्रज्ञाशिष्या रामदासी)

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

अर्थात स्मृतीग्रंथ वेगळंच सांगतात, ‘श्रुतीग्रंथ’ वेगळाच अर्थ सांगतात. असा एकही मुनी नाही ज्याचे एकच मत प्रमाण आहे. धर्माचा अर्थ गुहेमध्ये दडला आहे. मग सामान्य मानसासमोर एकच उपाय आहे व तो म्हणजे ‘महाजन’, ‘महान लोक’, ‘संत’ ज्या वाटेवर गेले तो मार्ग चालणे. हिंदुधर्माच्या एकूणच विस्ताराकडे पाहून युधिष्ठिराने दिलेले उपरोक्त उत्तर मार्मिक वाटते.

हिंदु जीवनपद्धतीला ‘धर्माच्या’ परिप्रेक्ष्यात पाहणे ही खूप अलीकडची बाब झाली. धर्माच्या चौकटीतून या जीवनपद्धतीकडे पाहणे ही इस्लाम, ख्रिश्चन, झोराष्ट्रीयन, पारसी इत्यादी धर्मियांनी आपल्या धर्माप्रमाणे हिंदूधर्म कल्पून व्यवहार केल्यासारखे दिसते. मुळात 'Religion' हे ‘धर्म’ या नितांतसुंदर संकल्पनेचे भाषांतर तितकेसे बरोबर नाही अशा मताचा मी आहे. एक धर्मोपदेशक, एक प्रेषित व एक धर्मग्रंथ म्हणजे 'Religion' रिलिजन’ असा सरळसरळ अर्थ पाश्चात्य भाषाशास्त्रात व तत्वज्ञानात पहावयास मिळतो. या चौकटीत हिंदुधर्माला बसवणे हा हिंदुधर्मावर अन्याय होईल.

मुळात ‘धर्म’ ही संकल्पना भारतीय विचारसंस्कृतीत खूप व्यापक अर्थाने वापरतात. एखाद्या वस्तुचा स्वभावतः अवतीर्ण होणारा गुण म्हणजे धर्म. एखाद्या व्यक्तीने आपले कर्तव्य यथोचित बजावले कि त्याला त्याचा ‘धर्म’ संबोधले जाते. विद्यार्थ्याचा धर्म अध्ययन करणे, शिक्षकाचा धर्म ‘अध्यापन’ करणे, पाण्याचा धर्म निरपेक्षभावाने खळाळत वाहणे. इतक्या व्यापक संकल्पनेचे 'Religion' या पाश्चात्य विचाराच्या चौकटीत बसवणे तात्विकदृष्ट्या तरी योग्य वाटत नाही.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने हिंदुधर्माला उपासनापद्धती व विचारदर्शन या दोन महत्वाच्या पैलूंवर अभ्यासले पाहिजे. मुळात भारतीय परंपरेने धर्म शब्दाची व्याख्या काय केली आहे हे पाहणे मोठे उद्‌बोधक ठरेल. महाभारतातील कर्णपर्वात कृष्ण अर्जुनाला सांगतात.

**धारणात् धर्ममित्याहु धर्मो–धारयते प्रजा।**
**यत्स्यात् धारणसंयुक्तः स धर्म इति निश्चितः।।**

अर्थात् जो धारण करतो तो धर्म. ज्यामधून प्रजा व सकलप्राणिमात्र आपल्या सर्वंकष प्रगतीसाठी मार्गस्थ होतील, जो सर्वांना सामावून घेणारा आहे त्याला धर्म म्हटले आहे. हिंदु जीवनदर्शन हे मुळातच (By default) सर्वांना सामावून घेणारं असल्यामुळे ‘हिंदुधर्म’ व ‘समावेशकत्व’ या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यामुळे इथे द्विरुक्तीचा दोष लागतो.

महाभारतात धर्माची अजून एक सुंदर व्याख्या आहे.

**लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियमः कृतः।**
**उभयत्र सुखोदर्क इह चैव परत्र च ।।**

अर्थात या भूतलावर लोकयात्रा सुखाने चालावी म्हणून धर्माचरणाचे नियम सांगितले

आहेत. हे नियम इहं आणि पर अशा उभयलोकी सुख देणारे आहेत. ही व्याख्या 'धारणाद्धर्ममित्याहुः' हिच्यापेक्षा अधिकस्पष्ट व अधिक निश्चित स्वरुपाची आहे. धर्म म्हणजे नियमबंधन आणि लोकयात्रा म्हणजे समाजाचा सार्वजनिक व्यवहार होय. धर्माने समाजाचे धारण होते असे सांगण्यापेक्षा धर्मनियमाच्या आचरणाने समाजाचे सर्व व्यवहार सुरळीत चालतात, असे म्हटल्याने धर्म म्हणजे नियमबंधन आणि समाजाला धारण करील असे काही तरी बंधन असल्याशिवाय धर्मकल्याणकारक होणार नाही, ही जाणीव होते.

इतर कोणत्याही धर्मापेक्षा हिंदु धर्माच्या प्रवर्तकांनी व शास्त्रकारांनी खोल, सूक्ष्म व दूरवर विचार करून व्यक्तीचे इह-पर कल्याण साधणारी आणि दुःख आदि अस्वास्थय कमी होवून अधिकाअधिक सुख देणारी अशी राहाणी शोधून काढली आणि त्याबरोबरच काही नियमही सांगून ठेवले. या नियमांनाच आचारप्रभवधर्म म्हणतात.

हिंदुधर्माची मांडणी विचारपूर्वक केलेली आहे. त्यामुळे तिच्यात टिकाऊपणा साहजिकच आला आहे. ज्या समाजरचनेत स्थितिस्थापकता (Flexibility) असते, ती समाजरजना अनंत कालापर्यंत टिकू शकते. कारण तीत बदलत्या परिस्थितीला अनुसरुन धर्मात कसे आणि काय फेर बदल करावे हे सांगितलेले असते. असा स्थितिस्थापकपणा ख्रिस्ती व इस्लामी धर्मांत नाही. त्या दोन धर्मांत जे नियम एकदा सांगितले गेले, त्यात कोणालाही केव्हाही बदल करायचा अधिकार नाही, असे मानले जाते. त्या दोन धर्मातील आचार-विचारास आधारभूत असा एकेकच ग्रंथ असतो. पण हिंदु धर्मात असा एकच ग्रंथ प्रमाणभूत मानलेला नाही. विशिष्ट कारणांसाठी विशिष्ट ग्रंथ हिंदू धर्मात प्रमाणभूत मानलेले ओत. एकाच ग्रंथात समाजाच्या सार्वकालिक सुख-स्वास्थासाठी नियम सांगणे शक्य नसते. जसजशी परिस्थिती बदलते, तसतसे धर्माला वेगळे वळण घ्यावे लागते. बदलत्या परिस्थितीत जुने नियम बदलावे लागतात. तशी व्यवस्था व आज्ञा हिंदु धर्मात आहे, हे त्याचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. म्हणूनच तो सर्वसमावेशक आहे.

हिंदुत्वाच्या अत्यंत चिंतनीय अशा दोन व्याख्या लोकमान्य टिळक व स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी दिल्या आहेत. स्वा. सावरकर म्हणतात :

**आसिंधुसिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका।**
**पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिन्दुरिति स्मृतः।।**

अर्थात सिंधू नदीपासून समुद्रापर्यंत पसरलेली ही भारतभूमी ज्याला पितृभू म्हणजे वाडवडिलांची भूमी आणि पुण्यभूमी वाटते, तो हिंदु होय. ही व्याख्या प्रामुख्याने भौगोलिक आहे. लोकमान्य टिळक अधिक व्यापक व्याख्या करतात.

**प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता।**
**उपास्यानामनियम एतद्धर्मस्य लक्षणम्।।**

अर्थात वेदांविषयी प्रामाण्यबुद्धी,

साधनांची अनेकता आणि उपास्य कोणते असावे याविषयी निश्चित नियम नसणे, हे हिंदु धर्माचे लक्षण होय.

वरील दोनही व्याख्या खूप व्यापक स्वरुपाच्या असून यातून हिंदूधर्माचे व्यापकत्व व सर्वसमावेशकत्वच सिद्ध होते. साधनांची अनेकता सांगणारी ही संस्कृती कोणावरच बळजबरी करत नाही. ईश्वर 'जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी' पाहणारी ही संस्कृती सकल मानव जातीच्या कल्याणाचा मार्ग प्रशस्त करणारी आहे.

हिंदुत्वाला किमान पाच हजार वर्षांचा दृश्य इतिहास लाभला आहे. भारतीयांनी याला आर्य सनातन वैदिक हिंदुधर्म अशी संज्ञा दिली.

एखादा धर्म सर्वसमावेशक होण्यासाठी त्या धर्माच्या मूलग्रंथांमध्ये सर्वांना सामावून घेणाऱ्या व्यापक तात्विक वैचारिक बैठकीची नितांत आवश्यकता असते. 'जे पींडी ते ब्रह्मांडी' या उक्तीनुसार धर्मात काही विमलज्ञानाने ओतप्रोत भरलेली तत्वे असली तरंच त्याचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन संकुचित न राहता व्यापक होतो. यजुर्वेदातल्या 'इशावास्योपनिषद' या अत्यंत महत्वाच्या उपनिषद ग्रंथात एक मंत्र आहे.

**ईशावास्यमिदं सर्व यत्किञ्च जगत्यां जगत्।**
**तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्यस्विद्धनम्।।**

अर्थात हे संपूर्ण विश्व ईश्वराने व्यापले आहे. ईश्वराला नित्य समीप मानून त्यागपूर्वक वस्तुंचा भोग घेतला पाहिजे. कोठेही मन आसक्त होवू देवू नये. भारतीय ऋषीपरंपरेने हा अमुल्य संदेश दिला की, सर्व प्राणीमात्रांमध्ये वनस्पती, जड-चेतन आदि सर्व गोष्टींमध्ये ईश्वराचा वास आहे. ज्ञानेश्वरांनी 'भूता परस्परे जडो। मैत्र जीवांचे' असा विचार मांडला आहे. हा विचार वरील वैदिक मंत्राचा प्राकृत आविष्कार होय. एकदा या विश्वातील सर्व जड-चेतनादि वस्तुंमध्ये समभावाने पाहण्याची दृष्टी अंगी बाणली तर जगात सर्व मित्रच होतीच. कुठलाही भेद नाही. हाच भाव मुखरीत करत भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायात भगवान कृष्ण म्हणतात -

**सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि।**
**ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः।।**

हिंदुत्वाने अत्यंत महत्वाच्या अशा चार गोष्टी ललामभूत मानल्या आहेत. ज्येष्ठ अभ्यासक कृष्ण गोपाल यांनी आपल्या 'भारत की संतपरंपरा और सामाजिक समरसंता' या आपल्या अजोड ग्रंथात याची चर्चा केली आहे. त्यांच्यामते हिंदुधर्माने सर्व प्राणिमात्रांत ईश्वर चैतन्याची अनुभूती मानली, कोणाचाही द्वेष, वैर अथवा घृणा करण्यास पूर्ण विरोध, सर्वांच्या विचार स्वातंत्र्याला पूर्ण अधिकार व सर्वांच्या मतांचा सन्मान केला. पंथांमध्ये, पुजापद्धतीमध्ये, देवतांमध्ये, भाषेमध्ये, आचारविचारामध्ये विविधता असूनही हिंदु म्हणून एकत्र येण्याची सहजप्रवृत्ती या धर्माच्या समावेशकतेमुळेच सिद्ध होते. पुष्पदन्त विरचित महिम्नस्त्रोत्रात एक श्लोक आहे.

**''रुचीनां वैचित्र्यात् रुजुकुटील नानापथजुषाम्। नृणांएको गम्यः त्वमसि पयसामर्णवइव।।**

आपापल्या रुचीच्या भिन्नतेमुळे लोक आपापल्या उपास्यदेवतेचे स्मरण करत शेवटी ज्याप्रमाणे भिन्न नद्या एकाच सागरास मिळतात तद्वतच सर्व पंथाच्या लोकांना शेवटी एकाच परमतत्वाकडे जावयाचे आहे असा या श्लोकाचा आशय. वरील श्लोक स्वामी विवेकानंदांनी आपल्या 'शिकागो' येथील सर्वधर्मपारिषदेत हिंदुधर्माचे सर्वसमावेशकत्व अधोरेखित करताना म्हटला होता. तसेच पूजनीय गोळवलकर गुरुजी देखील आपल्या व्याख्यानात या श्लोकाचा नेहमी उल्लेख करत असत.

ऋग्वेदात असं म्हटलं आहे की,

**अज्येष्ठासो अकनिष्ठास एते संभ्रातरो वावृधुः सौभगाय।** (ऋग्वेद ५.६०.५)

अर्थात यामध्ये कोणी छोटा व मोठा नाही. आम्ही सर्व समान आहोत व सौभाग्यप्राप्तिसाठी एकमेकांना मदत करत पुढे जात आहोत. ऋग्वेदातील 'सामनस्य सूक्ता'मध्ये एक विलक्षण ऋचा आहे -

**संगच्छध्वं सं वदध्वं सं वो मनांसि जानताम्। देवा भागं यथा पूर्वे सञ्जानाना उपासते।।** (ऋग्वेद १०.१९१.२)

वैदिक परंपरेतून मिळालेल्या या जीवनरसातून बहरलेल्या हिंदुधर्माच्या वृक्षाला अनेक दार्शनिक व महापुरुषांनी वृद्धींगत केले. भारतातील प्रत्येक राज्यातून आध्यात्म व भक्तीपरंपरेने उर्जस्वल स्वरुप धारण केले. दक्षिणेतील अलवार, नायन्मार, तिरुवल्लुवर, उत्तरेतील नाथपंथीय, नागा साधु, गुरुनानक, कबीर आहे. संत, महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ इत्यादी संतजनांनी हिंदुधर्माला सर्वव्यापक बनवून प्रस्तुत केले. महाराष्ट्रात तर प्रत्येक जातीतून संतत्वाला प्राप्त झालेला अवलिया संतपुरुष पहावयास सापडतो. संघस्थानावर म्हटल्या जाणाऱ्या 'एकात्मतास्तोत्रात' या सर्व परंपरेचा सुंदर मिलाफ पहावयास मिळतो.

संतजनाबाई यांचा वारकरी संतपरंपरेवर रचलेला एक सुंदर अभंग आहे.

**विठु माझा लेकुरवाळा। संगे गोपाळांचा मेळा।**<br>
**निवृत्ती हा खांद्यावरी। सोपानाचा हात धरी।**<br>
**पुढे चाले ज्ञानेश्वर। मागे मुक्ताई सुंदर।**<br>
**गोरा कुंभार मांडीवरी। चोखा जीवा बरोबरी।**<br>
**बंका कडेवरी। नामा करांगुळीधरी।**<br>
**जनी म्हणे वौ गोपाळा। करी भक्तांचा सोहळा।।**

वरील अभंगात महाराष्ट्रातील तत्कालीन जातीतून एक प्रतिनिधित्व करणारं उदाहरण जनाबाई मांडतात. सर्वांना सामावून घेवून भक्तीक्षेत्राच्या या सुंदर दृश्यात बोलकेपणा आढळतो.

समष्टीकडे पाहण्याचा एक निकोप दृष्टीकोन या परंपरेने आपणास दिला आहे. भक्तीयोगाची अत्यंत रमणीय व बोलकी व्याख्या ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीत करतात :

**जे जे भेटीजे भूत। ते ते मानिजे भगवंत।**

**हा भक्तीयोग निश्चित। जाण माझा।।**

जी व्यक्ती वा भूत (जड चेतन) मला भेटतं त्या सर्वांना मी भगवंताचा अंश मानणे म्हणजे 'भक्ती' हा विचार ज्ञानेश्वर देतात. सनातन धर्माचा हा स्थितिस्थापकत्वाचा विचार वैदिक परंपरेपासून संतपरंपरेपर्यंत अभिसरीत झाला. अगदी इस्लामच्या भारतातील दृश्यस्वरुपावर वेदांताचा प्रभाव पडून 'सुफी' परंपरेचा उदय झाला. येथे येणाऱ्या प्रत्येक परकीय आक्रमकावर हिंदु धर्मातील या उदात्त तत्वांचा प्रभाव पडला. दारा शिकोहने उपनिषदांचा पर्शियन भाषेत 'सिर्रे-अकबर' या नावाने अनुवाद म्हणून तर करून घेतला. या पर्शियन भाषेतील भाषांतरावरून लॅटीन, जर्मन व नंतर इंग्रजीत उपनिषदांची भाषांतरे झाली व जगाला हिंदु धर्माची मुलतत्वे कळली. अनेक हजार वर्षांपासून अनेक आक्रमकांनी केलेल्या हल्ल्यांमधून ही संस्कृती आज देखील मोठ्या सन्मानाने उभी आहे याचा मुलस्त्रोत हा त्याच्या सर्वसमावेशक तत्वज्ञानात आहे हे विसरून चालणार नाही. हाच विचार प्रख्यात जर्मन तत्वा मॅक्समूलर याने आपल्या "India : What It Can Teach Us" या ग्रंथात सूत्ररुपाने मांडला आहे.

"If I were asked under what sky the human mind has most fully developed some of its choicest gifts, has most deeply pondered over the greatest problems of life, and has found solutions of some of them which well deserve the attention even of those who have studied Plato and Kaut, I should point to India.

And If I were to ask myself from what literature we who have nurtured almost exclusively on the thoughts of Greeks and Romans, and of the Semitic race, the Jewish may draw the corrective which is most wanted in order to make our inner life more perfect, more comprehensive, more universal, in fact more truly human a life... again I should point to India."

•••

**संस्थापक व विश्वस्त सद्धर्म यांच्याकडून**

*वाचक, देणगीदार, लेखक आणि हितचिंतक या सर्वांना*

**दसरा व दिवाळीच्या**

**हार्दिक शुभेच्छा!**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर

**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१

**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१